# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 30.08.2010 रोजी (का.प.क्रं.06) संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक 30 ऑगष्ट 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी 03.45 वाजता **वंदेमातरम्** या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त, डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.आगा खान मीयॉ खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
09. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
10. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
11. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
12. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
13. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**<u>चर्चा :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य :अर्ध्या तासाचा वेळ चर्चेसाठी देण्यात यावी.

मा.सभापती :चर्चेसाठी वेळ देण्यात येतो.

श्री.रेणुकादास वैद्य :धन्यवाद. मागील तीन महिण्यांपासुन वार्ड-ड च्या अंतर्गत जेवढे नगरसेवक येतात ते सर्व नगरसेवक मागील 3 महिन्यापासून परेशान अवस्थेत आहे. ड्रेनेजचा विषय आहे. पावसाळयाचे दिवस आहे नाला साफसफाई योग्य रितीने झालेली नाही. नाल्याचा फ्लो वाढलेला आहे नाल्याची उंची वाढल्यामुळे अनेक ठिकाणी ड्रेनेज चोकअप झालेले आहे. ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत आहे. पावसाळयाचे दिवस त्यामुळे रोगराईचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. वार्ड-अ आणि ड मिळुन एक उपअभियंता आहे परंतु सर्वसाधारणपणे वार्डमध्ये ते येत नाही. प्रभाग ड मध्ये 17 वार्ड येतात त्यासाठी फक्त एकच ज्युनिअर इंजिनिअर आहे श्री.गायकवाड त्यांची तब्येत अधुन मधून खराब असते. 3-3 -4-4 दिवस उपलब्ध होऊ शकत नाही. लेबर 4, दुय्यम आवेक्षक नाही. सकाळी 7 ते 11 वाजेपर्यंत सर्व नगरसेवक ड्रेनेज या विषयावर परेशान असतात. अधिकारी देतांना सदरील वार्डाची व्याप्ती अडचणी यासर्वांचे योग्य प्रकारे नियोजन करून अधिकारी दिल्यास

प्रश्न निर्माण होणार नाही. 'ड' विभागास एक स्वतंत्र उपअभियंता व एक अतिरिक्त डेप्यूटी इंजिनिअर आणि दुय्यम आवेक्षक वार्डास दिल्यास या गोष्टींवर नियंत्रण राहील. मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रत्येक झोनमध्ये जेटिंग मशीन देणार होते त्याबाबत कार्यवाही झालेली नाही. आम्हाला व नागरीकांना मदत होईल अशा पध्दतीने कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. मा.आयुक्तांनी याबाबीकडे लक्ष द्यावे कनिष्ठ अभियंता कोठे असावे, उपअभियंता कोठे असावे किती असावे. पाणीपूरवठा व ड्रेनेजला एकच उपअभियंता आहे. एकच कनिष्ठ अभियंता आहे. पाण्याचे लिकेज ड्रेनेजचे चोकअप काढण्यासाठी 15 दिवसांचा अवधी लागतो.

शहर अभियंता :वार्ड-अ ड साठी उपअवेक्षकांची मागणी केली आहे. आज आदेश निघतील.

श्री.मधुकर सावंत :चार लेबर मध्ये कामे केली जातात. आठ ते बारा किलोमिटरचे एका वार्डाचे क्षेत्रफळ आहे. पन्नालाल नगर गणपती मंदिरजवळ ड्रेनेजचे पाणी वाहत आहे. आठ दिवसांपासुन सदरील काम करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध होत नाही. अधिकारी आजारी आहे.

श्री.अमित भुईगळ : मोबाईल बंद करून ठेवतात. काल फोन केला होता.

श्री.रेणुकादास वैद्य : त्यांच्याही अडचणी लक्षात घ्यावी , 17 वार्डाला एक कनिष्ठ अभियंता 34 वार्डासाठी एकच डेप्यूटी इंजिनिअर आहे. त्यामुळे कामे होत नाही. प्रत्येक वार्डात किमान दहा ड्रेनेजच्या गंभीर समस्या दररोज निर्माण होतात. यंत्रणा सुधारण्याची गरज आहे. रस्त्याचे कामाचे मागील 4-5 महिण्यांत एकही इस्टीमेट तयार झालेले नाही. यंत्रणेत बदल करावा. त्यामुळे सदरील अधिकारी यांना ड्रेनेजच्या कामासाठी वापरण्यात यावे.

श्री.आगाखान : 3 महिन्यापूर्वी एक बैठक झाली होती, त्यात जेटींग मशिनवर चर्चा झाली होती. जेटींग मशीन नाही. 16 वार्डासाठी एक प्रत्येक झोन वाईज देण्यांत यावे.

श्री. अमित भुईगळ :महानगरपालिकेकडे तीन जेटींग मशीन असुन त्यातील एक तरी मशीन दुरूस्तीसाठी असती. 3 जादा जेटींग मशीन घेण्यासंदर्भांत रूलिंग देण्यात आली होती. त्याबाबतीत कार्यवाही झालेली नाही. पावसाळ्याचे दिवस आहे. रोगराई पसरत आहे. 3 जादा जेटींग मशिन घ्यावी.

श्री.विजय वाघचौरे :वार्डातील सिव्हीर लाईन मागील वर्षात दोन वेळेस चोकअप झालेली आहे. 14 ते 20 फुट खोल आहे परत परत चोकअप होते. सदरील लाईनचे कायमचा बंदोबस्त करण्यात यावा.

श्री.महेश माळवतकर :वार्ड क्रमांक 17 श्रीकृष्णनगर मधील एन-9 येथील ट्राफिक गार्डनजवळील नाल्याची संरक्षक भिंत नसल्यामुळे नाल्याचे आताच्या पावसाच्या पाण्यामूळे, तेथील नागरीकांच्या घरात येते. मा.आयुक्तांनी 15 दिवसांपूर्वी रॅम्केसोबत बैठक घेऊन सूचना करण्यात आली होती की, ज्या ठिकाणी डपिंग पॉईन्ट असेल त्या ठिकाणी स्कीप लोडर ठेवण्यांत यावे. ज्या ठिकाणी डंपिंग पॉईन्ट उघडयावरती आहे त्या ठिकाणी सिमेंट कॉंक्रेटीकरण करण्याचे सांगण्यात आले होते परंतु सभागृहास व प्रशासनास या फोटोपण दाखवतो, सदरील नाल्याचे काम गेल्या दिडवर्षांपासुन चालु आहे परंतु चार

महिण्यांपासुन नाल्याच्या संरक्षक भिंतीचे काम बंद अवस्थेत आहे. याबाबतीत मा.कार्यकारी अभियंता, वॉर्ड अभियंता,प्रशासनाचा सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. थातूरमातुर उत्तरे मिळतात. परंतु कंत्राटदार काम करण्यास टाळाटाळ करीत आहे. मंजूर असलेले काम करण्यास नकार देत आहे त्यामुळे सदरील कंत्राटदारास हे काम तातडीने करण्यास सांगीतले पाहिजे. नाल्याच्या भिंतीला लागून घरे आहेत. सांडपाणी काढता येत नाही. पॅचवर्क नाही. तीन चार वार्डातील नाल्याचे पाणी पूढे एस.पी.ऑफिसकडे जाते. तेथील दोन्ही बाजूचा नाल्याचा कठडा तुटला त्याचे काम झाम झाले नाही. रॅमकी डंपींगच्या बाजूला कचरा पडलेला त्या बाजूला नागरी वस्ती तेथील घरातील दोन दोन माणसे आजारी पडलेले आहेत. औषधांची फवारणी वार्डात होत नाही फक्त फवारणी ही कागदावर करण्यात येते. जर सिडकोत 7 ठेकेदार महिण्याला 7-7 लाख दिले जातात नागरीक आजारी पडतात तर ते कोणत्या प्रकारचे औषधी वापरतात. कोणत्या प्रकारची धुराची फवारणी करतील या बाबतीत शंकेला वाव येतो. औषधांच्या फवारणीबाबत प्रशासनाचे कुठलेच नियंत्रण नाही. ठेकेदाराला पैसे दिले जाते. नाल्याच्या संरक्षीत भिंतीचे रखडलेले काम तातडीने दोन दिवसात करण्याचे आदेश देण्यात यावे तसेच वर उल्लेख केलेल्या मुद्दांवर तातडीने कार्यवाही झाली पाहिजे. डंपींग पॉइंट उठवण्याची व्यवस्था व्हावी.

श्री.रेणुकादास वैद्य :पन्नालाल नगर येथे पाण्याचा दिवस त्या दिवशी ओव्हर फ्लो, ड्रेनेजचे पाणी तसेच पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर पाणी वार्डातील गल्ल्यामधुन रोडवर वाहत जाते.नळांचा प्राबलंब,तोट्या नाही,वाहत असते.नुसती चेरापुंजी झाली. यापुर्वी या विषयाबाबत वार्डातील अधिकारी,कनिष्ठ अभियंता, उपअभियंता यांच्याकडे सदरील समस्या वेळोवेळी मांडल्या आहेत. परंतु यात सुधारणा होत नाही. त्यामुळे प्रशासनाने या समस्येकडे लक्ष घालुन समस्या तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करावा.

श्री.जगदिश सिध्द :वार्ड क्रमांक 39 राजाबाजार, कुंवारफल्ली, जाधवमंडी, लक्कडमंडी, खाराकुआँ परिसरात 4 महिने झाले. घाण पाणी येण्याची समस्या आहे. मा.आयुक्तांना यासंदर्भात निवेदन दिलेले आहे परंतु समस्या सुटलेली नाही. रोगराईचे दिवस. सतत 15 मिनीट पूर्ण घाण पाणी येते. शहर अभियंता, उपअभियंता,मा.आयुक्तांना सांगीतले प्रश्न सुटलेला नाही. सदरील भागातील कमीत कमी 50 नागरीक घाण पाण्यामुळे आजारी पडलेली आहे. मा.सभापती, मा.आयुक्त व शहर अभियंता यांनी प्रभागात पाणी पुरवठ्याच्या वेळात सकाळी 5.00 वाजता पहाणी करावी व सदरचा प्रश्न सोडविण्यात यावा. 15 ते 20 मिनिट घाण पाणी.

श्री.अमित भुईगळ :स.सदस्यांचे फोन उचलण्यास अधिकारी यांना सांगण्यात यावे. कर्तव्य समजून फोन उचलले पाहीजे. दुजोरा दिला पाहीजे. स.सदस्यांचा फोन घेतला नाही तर कारवाई करण्यात येईल म्हणुन आदेशीत करण्यात यावे.

श्री.जगदीश सिध्द : मा.आयुक्तांनी व मा.सभापतींनी सकाळी 5.00 ची पाहणीसाठी वेळ द्यावी.

मा.सभापती :शहर अभियंता व संबंधीत अधिकारी यांनी प्रभागात पाणीपुरवठाच्या वेळात

सकाळी 5 पासून पहाणी करावी व सदरचा प्रश्न सोडविण्यात यावा ज्या ठिकाणी चोकअप असेल तेथे दुरूस्ती करून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.विकास जैन :प्रभाग ड मध्ये 17 वार्डासाठी 01 ज्युनिअर इंजिनिअर आहे. त्यामुळे सक्षमपणे प्रत्येक समस्येकडे लक्ष देऊ शकत नाही. त्यामुळे प्रभागाच्या गरजेनुसार इंजिनिअर कर्मचाऱ्यांची संख्या देण्यात यावी. कर्मचारी देत असतांना इतर प्रभागावर अन्याय होणार नाही याची काळजी घेऊन निर्णय प्रशासनाने घ्यावे. 6 वार्डाचा चार्ट तयार करावा. सर्व प्रभागात स्लम आहेत. सर्वांना त्रास आहे. आम्ही ड चे सदस्य होतो आम्हाला समस्या माहित आहे. बॅलेसींग करून निर्णय घ्यावा.

श्री.नासेर खान :समतानगर पेंन्शनपुरा येथील समस्या सोडविण्यासाठी आज सकाळी 4.30 वाजता पाण्याच्या समस्येबाबत पाणीपुरवठा अधिकारी यांना फोन लावला असता त्यांनी तो उचलला नाही. आज पाणी आले नाही. त्यांना विचारणा केली तर परवा जी.बी.मध्ये चर्चा झाल्याप्रमाणे सर्व अनधिकृत नळ तोडण्यात यावे. असे त्यांना सांगण्यात आले. सर्वसाधारण सभेत चर्चावेळी व उपअभियंता,कार्यकारी अभियंता त्यांना वेगळे प्रकारे घेतात. माझ्या वॉर्डातील 6 महिन्यापासून नाल्याचा प्रश्न तो अद्यापही झाले नाही. वार्डातील नळांना सुरवातीच्या 20 मिनीटे दुषित पाणीपुरवठा होतो. नंतर 10 मिनीट पाणी येते नंतर बदं. लाईन करायलाच 15-20 मिनिटे लागते. कोटला कॉलनी आणि क्रांती चौक येथील पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर वार्डात पाणी येते. टाक्या भरल्या नाहीतर पाण्याची समस्या निर्माण होते. ते सांगतात जेवढे अनधिकृत नळ बंद करा नंतर पाणी येते की नाही ते पाहु.

श्री.रेणुकादास वैद्य :वार्डात बाबा हरदास नगर भागात मागील पंचवार्षिक पासुन नळ कनेक्शन साठी इस्टीमेट तयार आहे. उतारावरून कनेक्शन करावे. परंतु आज पर्यंत कुठलिही कार्यवाही झालेली नाही. 100 टक्के टॅक्स पे नागरीक त्या ठिकाणी राहत आहे. तरीही पाण्याचा प्रश्न त्या ठिकाणी आहे. दिवसाआड द्यावे लागते. प्रशासनास याची कल्पना दिलेली आहे. सर्व अधिकाऱ्यांना बोललो. जेव्हा प्रशासनास तक्रार केली जाते त्यावेळी पाण्याचे टँकर पाठविले जाते.15 दिवस पाणी येत नसेलतर तेथील नागरीकांनी जगायचे कसे. प्रशासन यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणार आहे किंवा नाही.याचा खुलासा अपेक्षित.

श्री.मधुकर सावंत :वार्डात पाणी वेळेवर येत नाही. याबाबतीत अधिकारी यांनी लक्ष दिले पाहिजे योग्य नियोजन करण्याची गरज आहे. 4 गल्ल्यांना मिळते 2 गल्ल्यांना नाही.

श्री.विजय वाघचौरे :माझ्या वार्डात साफसफाई करीता मजूरांची आवश्यकता आहे. एक महिण्यांपुर्वी मजूरांचे आदेश काढण्यात आले परंतु आजपर्यंत सदरील मजूर रूजू झालेले नाही. मोठा वॉर्ड आहे. का लेबर जाइन होत नाही. घंटागाडीच्या मजूराची बदली केली परंतु त्याच्या जागेवर बदली झालेला कर्मचारी रूजू झालेला नाही. रॅमकी कचरा उचलत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रभाग ड मध्ये विद्युतीकरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. विद्युत विभागात कनिष्ठ अभियंता उपअभियंता एकच आहे. 17 वार्डाचे 17 नगरसेवक त्यांचा फोन घ्यायचे म्हटले तरी वेळ संपते. 17 वार्डात लाईटचा प्रश्नासाठी

| | |
|---|---|
| | तेच अधिकारी आहे. कनिष्ठ अभियंता,उपअभियंता एकच आहे. 17 वार्ड 17 नगरसेवक. कंत्राटदाराला लाईट बंद असल्याचे सांगीतले असता मटेरिअल नाही म्हणून सांगण्यात येते. लाईट बंद आहे हे नगरसेवकाने ज्युनिअर इंजिनिअर/डेप्यूटी इंजिनिअरला माहिती द्यायची. लाईनमनने काहीही काम करायचे नाही. नगरसेवकाने तक्रार केल्यानंतर वार्डात येवुन एक ते दोन लाईट सुरू करणार नंतर पुन्हा पहिल्यासारखी परिस्थिती. कंत्राटदाराला लाखो रूपयाची बिले कशासाठी देण्यात येतात. बी.ओ.टी.च्या बाबतीतही तीच समस्या आहे. उपाय योजना करावी. बीओटी अख्खा पॅनेल बंद आठ आठ दिवस बंद असतो. |
| श्री.विजय वाघचौरे | :लाईट सुरू करण्याच्या बाबतीत नियमितता नाही. माझ्या भागात तीन दिवसांपासून लाईट बंद आहे. टाईमर लावलेला नाही.रात्री आठ वाजता येतो. |
| मा.सभापती | :99 वार्ड त्रस्त, टेंडर रद्द करावे व पुर्वी प्रमाणे काम सुरू करण्यात यावे म्हणुन रूलिंग दिली होती. कंत्राटदाराकडुन कामे करून घेणार आहे की, दुसऱ्या एजन्सी कडुन कामे करणार आहे का की, मनपातर्फे करणार आहे खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :टाईमपिरेड संपलेला आहे का? |
| | (सभागृहात अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलतात) |
| मा.सभापती | :मागील बैठकीत रूलिंग दिली होती त्यात प्रशासनाने कुठली कार्यवाही केली. आपणाकडे मॅनपावर नसेल तर काय उपाययोजना केली आमच्या समोर ठेवावे. |
| श्री.प्रल्हाद निमगांवकर | : करारनाम्यात 1 दिवा बंद 10 रू. दंड प्रती दिवस माझ्या वार्डातील 25 लाईट बंद आहेत. किती दंड आकारण्यात आला. |
| शहर अभियंता | :मागील बैठकीत निवीदा रद्द करण्याबाबत निर्णय झाल्यानंतर तीन कार्यकारी अभियंता यांच्या वार्डात एक कॉम्प्रेसिव्ह व एक बीओटी चा एकच कंत्राटदार आहे. तीन तीन वर्षाचा करार करण्यात आलेला आहे. कायदेशीर बाबी तपासुन माहिती घेऊन प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणला जाईल. |
| श्री.महेश माळवतकर | :मधल्या काळात कंत्राटदाराचे बिल देण्यात आले का? करारनामा 1 लाईट बंद 10 रूपये दंड. |
| | (सभागृहात अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलतात) |
| श्री.जगदिश सिध्द | :शहरातील एक एक एरियाचे लाईट बंद ठेवले जातात. |
| श्री.महेश माळवतकर | :अशामध्ये कंत्राटदाराचे बिल दिलेले आहे का? परत एकदा विचारा. |
| मा.सभापती | :प्रशासनाकडे याबाबीत काहीही उत्तर नाही. कंत्राट त्वरित रद्द करण्यात यावे. नविन निवीदा काढण्यात यावे नसता मनपाचे अधिकारी शहर अभियंता यांची बैठक लावण्यात यावी. आपल्या लाईनमकडून काम नसेल होत तर तात्काळ दुसरी निविदा काढण्यात यावी. |
| श्री.जगदिश सिध्द | :प्रशासनाचे नियंत्रण आहे की नाही आपण करारनामा करतो. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :कंत्राटदाराला काम सांगीतल्यास मटेरिअल कमी पडले आहे म्हणुन सांगण्यात येते. |
| श्री.विजय वाघचौरे | :ठेकेदारावर वचक नाही. त्यांची वकीली करतात. कोणतेही ॲग्रीमेंट असो |

रॅमकी असो की, इतर आपण कसे बांधून घेतले.

श्री.जगदिश सिध्द :विधी सल्लागार यांनी कोणतेही ॲग्रीमेंट बाबत कायदेशिर माहिती तपासण्यात आली पाहिजे त्यांना ॲग्रीमेंटची माहिती द्यायला पाहिजे.

श्री.विकास जैन :प्रशासनाचे यावर नियंत्रण हवे.

श्री.जगदिश सिध्द : अधिकारी त्यांचे वकिली करतात का.

श्री.रेणुकादास वैद्य :रस्ते,विज,पाणी या सर्व गोष्टींची माहिती प्रशासनाला आम्ही द्यायची.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मागील स्थायी समिती बैठकीत दिलेल्या रूलिंग आजच्या आज काम बंद, काय केले खुलासा करायला नाही. प्रशासनाने काय कार्यवाही केली.

श्री.जगदिश सिध्द :जी रूलिंग दिली होती त्यांनी काय कार्यवाही केली. त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सहा वार्डाचे वतीने मा.आयुक्तंनी Authorised केले असेल तर ठिक आहे. सभागृहाची वेळ विनाकारण वाया घालू नये. वार्ड क मध्ये कुठले लाईट चालू आहे माहिती देण्यात यावी. मा.सभापती यांनी जी रूलिंग दिली होती 99 वार्डाचे लाईटचे काम व्यवस्थीत नाही. प्रशासनाने काय कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा.

श्री.जगदिश सिध्द : रूलींगवर प्रशासनाने काय केले. ते कार्पोरेशनचे कर्मचारी नसून बी.ओ.टी. चे वकिल आहे.

उपअभियंता(विद्युत) :शहरात दोन प्रकारची विद्युत व्यवस्था आहे. एक बीओटी आणि दुसरी कॉम्प्रेसिव्ह तत्वावर आहे. बीओटीचे जवळपास शहरात दहा हजार लाईट आहे ते सुरू करण्याची आणि 7 वर्ष देखभाल दुरूस्तीची जबाबदारी त्यांच्यावर आहे. मेन रोडवर शहरातील 250 वॅट याठिकाणी आहे. ते काढायचे आणि 96 वॅटचे दिवे लावायचे यामध्ये जी सेव्हींग होती त्यातील 77 टक्के हिस्सा ठेकेदार आणि 23 टक्के हिस्सा मनपा अशा पध्दतीने आहे. काम चालु आहे. वेळोवेळी देखभाल दुरूस्ती चालू आहे. यापध्दतीमध्ये ठेकेदारास काम करतांना वेळोवेळी पेमेंट होणे गरजेचे आहे. त्यांना मटेरिअलसाठी निधीची आवश्यकता असते. दिनांक 16 तारखेला बैठक घेऊन मा.आयुक्तांनी याबाबतीत सकारात्मक निर्णय घेतलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जी विद्युत बजच होईल त्यातुन ते पैसे द्यायचे आहे. एका वर्षात किती बचत होती. Difference Calculate करतांना कुठली System वापरण्यात येते. कशाच्या आधारावर बील देतो. मनपाचे जे पोल आहे त्यांची स्थिती, वायर, केबल यांची स्थिती कशी आहे. एका वर्षात किती बचत, कॅपेसीटर काम करतात का.

उपअभियंता (वि) :शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 11 तास 250 वॅटचे किती नंतर व 96 वॅटचे लावले. त्यांचे मार्फतच 250 वॅटचे किती व 96 वॅटचे किती MSEB Bill जे येतात नियमाप्रमाणे 40 टक्के ते 40 टक्क्यापैक्षा जास्त आहे. त्यानुसार सध्याची सिस्टीम चालू आहे.विज बचत 40 टक्केपेक्षा जास्त आहे.

श्री.जगदिश सिध्द :लाईट बंद असल्यामुळे सेव्हींग होणारच आहे.

उपअभियंता (वि) :शहराची अवस्था अशी आहे सन 1984 साली रूजु झालेलो आहे त्यावेळी 4 ते 5 अभियंते होते 6000 पोल होते आज तेवढेच अभियंते 35,000 पोल

आहे. परंतु मनुष्यबळ पुर्वीप्रमाणेच आहे. कोंप्रेहेन्सीव्ह प्रमाणे 6 ठेकेदार सहा प्रभागाचे एकुण कंत्राट 1 ोटी 35 लाख 76 हजार चे एकुण एस्टीमेट आहे. तीन वर्षाचे परंतु यामध्ये 1 कोटी 66 लाख एका प्रभागाचे एक वर्षाचे आहे. एका प्रभागात 16 ते 17 वार्ड येतात म्हणजे एका वार्डाचे 13000 रूपये महिना ठेकेदाराला देण्यात येतात. एवढया कमी पैशात काम करून घेतो. चार ते पाच टक्के लाईट बंद आहे त्याठिकाणी दंड लावण्यात आलेला आहे.

श्री.जगदिश सिध्द : आज कोणत्याही वॉर्डात भेट देऊ. मी स्वतः फोन करून सांगितले आहे.
(याच वेळी अनेक स.सदस्य एकत्रित बोलतात.)

श्री.जगदिश सिध्द :फोनद्वारे लाईट बंद असल्याच्या तक्रारी अनेक वेळा केलेल्या आहेत.

उपअभियंता (वि) :दंडनीय कारवाई करण्यात आलेली आहे प्रत्येक वार्डात ठेकेदाराला एक लाख रूपये दंड लावण्यात आलेला आहे. शहरातील प्रत्येक पोल खराब झालेले आहे, जंक्शन बॉक्स नाही, केबल खराब झालेले आहे.40000 पोल पैकी, 10 ते 15 टक्के सोडले तर पोल खालुन सडलेले आहे. रिस्क घेवून काम करतो. एका पोल बदलण्यास 25000 रूपयांचा खर्च येतो. शहरातील पुर्ण सिस्टीम जुनी झालेली आहे संपुर्ण पोल चेंज करायचे म्हटल्यास करोडो रूपये लागतील. यासाठी बजेटमध्ये तरतूद ठेवणे आवश्यक आहे. शहरातील 95 टक्के लाईट सुरू आहेत. प्रत्येक पावसाळयात 2-3 उपघात होतात ठोस निर्णय होऊन बजेटमध्ये तरतूद होणे आवश्यक आहे.

श्री.नासेर खान :माझ्या निधीतून वार्डात चार पोलची उभारणी केलेली आहे परंतु लाईट, केबल अद्याप ओढण्यात आलेले नाही. 6 महिने झाले. संबधीत अधिकारी ठेकेदाराची बाजु घेत आहे. ठेकेदारांशी संगनमत आहे. यांचे घरचे ठेकेदार आहेत. तोडून कामे देतात. समतानगरच्या कामासंबधी पाहणी करण्यास सभा तहकूब करून पहाणी करावी.

श्री.जगदिश सिध्द : श्री.बनसोडे यांनी फार जबाबदारीने वक्तव्य केले, त्यांचे म्हणण्याप्रमाणे शहरातील 95 टक्के लाईट सुरू आहेत. हि सभागृहाची दिशाभुल करीत आहे. त्यांचेवर कार्यवाही करण्यांत यावी चेक करा. यांनी फार जबाबदारीने व्यक्तव्य केलेले आहे. शहरात पहाणी करण्यात यावी. आज माझ्या वार्डातील 95 टक्के लाईट सुरू नाही. संबधीत अधिकारी खोटी माहिती सादर करीत आहे. सदस्यांच्या मध्ये बोलू नका. त्यांना ताकीद द्या, त्यांना बाहेर काढा किंवा आम्हाला बाहेर काढा. कार्यवाही करा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : शहरातील 50 टक्के लाईट सुरू असेल तर राजीनामा देईल.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :शांती निकेतन चौक ते काबरा नगर रोडवर एक महिण्यापुर्वी 17 पोलवरील संपुर्ण लाईट फोडलेले आहेत. रमजानचा महिना सुरू आहे. संबधीत अधिकारी/ लाईनमन यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार द्यायला पाहिजे होती. सदरील लाईट एक महिण्यांपासून बंद अवस्थेत आहे सणासुदीचे दिवस आहे. श्रावण, रमजानचा महिना आहे. सदरील लाईट सुरू करण्यात यावे. प्रत्येक पोलवरील लाईट नादुरूस्त, बंद अवस्थेत याबाबतची माहिती नगरसेवकांनी द्यायची का? लाईनमन यांचे काम काय आहे. हि सर्व माहिती संबधीत विभागाच्या लाईनमनने द्यायला हवी.

श्री.अमित भुईगळ :लाईट फुटत असतील तर लाईनमन काय करतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मागील बैठकीत मा.सभापती यांनी रूलिंग दिली होती त्याबाबत प्रशासनाने कुठली कार्यवाही केली आहे.

श्री.विकास जैन :3000 चे चेंबर दुरूस्त होत नाही. स्थायी समितीने बजेटला मंजूरी दिलेली आहे. स.सदस्यांनी बजेट पुटअप केलेले आहे. परवानगी घेऊन छोटे कामे सुरू करण्यात यावे.

मा.सभापती :तात्काळ चालु करण्यात यावे.

श्री.विकास जैन :स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्या बेसवर छोटे काम करावे.

मा.सभापती :अत्यावश्यक कामे, छोटे मोठे कामे तात्काळ चालु करण्यात यावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :वार्डात फिरून त्यांनी बघायचे जगार ते घेतात दिवसातुन 100 फोन करावे लागतात.

श्री.विजय वाघचौरे :माझ्या भागातील लाईट तीन दिवसांपासून बंद अवस्थेत आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :गेल्या 1 महिण्यापासून लाईट बंद आहेत. मी 17 लाइट बद्दल विचारले त्याचे काय?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अधिकारी सभागृहाची दिशाभूल करित आहे कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांच्या वार्डातील 17 लाईट बंद अवस्थेत आहे. ते तात्काळ आजच्या आज चालु करण्यात यावे. 50 टक्के पेक्षा जास्त लाईट चालू असतील तर राजीनामा देईल.

उपअभियंता (वि) :एक महिण्यापुर्वी स्वत: पहाणी केली होती सर्व लाईट सुरू अवस्थेत होते. सध्या ते लाईट बंद आहेत. त्या भागात 8 ते 10 दिवसांत लाईट फोडण्यात येतात. दुरूस्ती केल्यावर त्याच पध्दतीने ठेवत नाही.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :योग्य तो बंदोबस्त करण्यात यावा. व्यवस्था करण्यात यावी. दंड आकारण्यात यावा.

श्री.अमित भुईगळ :विषय पत्रिकेस सुरूवात करण्यात यावी.

मा.सभापती :पुर्वी बिओटीवर व ठेका दिलेला आहे. रेकार्डप्रमाणे ते सर्व अपयशी ठरले आहेत. आपण एक बैठक घ्यावी. महानगरपालिकेच्या वतिने पुर्वी जसे चालवित होते तसे करा किंवा ताबडतोब निविदा रद्द करा. निविदा 8 दिवसात काढावी किंवा यासंबधी खुलासा करण्यात यावा. आता या विषयावर कोणीही नगरसेवक बोलणार नाही. ड विभागाचाही खुलासा करण्यात यावा. लाईटबद्दल तात्काळ बैठक घ्यावी.

मा.आयुक्त :लाईट व इतर बाबतीत जे इश्यू काढण्यात आले होते. इंजिनीअर्स कमी आहेत वार्डमध्ये काम जास्त आहे. याबाबतचे नियोजन ताडतोब शहर अभियंता यांनी करावे.

मा.सभापती :अशी परिस्थिती ज्या ज्या वार्डात असेल तेथेही करावी.

मा.आयुक्त :पथदिवे बाबतचा विषय गंभिर स्वरूपाचा आहे. श्री.बनसोडे कडून जी माहिती देण्यात आली ती कुचकामी आहे. मध्यंतरी सकाळी 11 वाजता नक्षत्रवाडी येथील लाईट सुरू होते. 16 तारखेला सकाळी 10 वाजता स.श्री.जोशी पालिका सदस्य यांचा फोन होता. नगरसेवकांनी माहिती दिली कि, त्या ठिकाणची लाईट सुरू आहे. मी त्यांना फोन केला त्यांचेशी बोललो

त्यावेळी 9 वाजून 56 मी. सकाळी लाईट चालू होते. कंत्राटदाराची आणि संबधीत अधिकारी यांची तातडीने बैठक घेतली व काही कडक अशा सूचना देण्यात आल्या. प्रभाग निहाय प्रत्येक वार्डाचा लाईट सुरू व बंद असल्याचा अहवाल देण्यात यावा. अशास प्रकारे शहरातील अनेक भागातील लाईट दिवसा चालु असल्याचे तसेच रात्री बंद असल्याचे आढळुन आले. या संदर्भांत नागरीकांच्या तक्रारी वाढत आहे. यासंबधी यापुर्वीही वेळोवेळी अभियंत्यांना याबाबतीत पत्राद्वारे वारंवार सूचना केलेल्या आहेत. परंतु तरीही काहीच सुधारणा आढळून आली नाही. संबधीत अधिकारी यांना दोन दिवसाची मुदत देण्यात आली. ज्या भागातील लाईट दिवसा चालु व रात्री बंद आहे ते ताबडतोब देखभाल, दुरूस्त करून घेण्यात यावी. या कालावधीत सुधारणा आढळून न आल्यास संबधीताविरूध्द पोलिस ठाण्यामध्ये FIR दाखल करण्यात यावा. संबधीताच्या गोपनिय अहवालामध्ये त्याची नोंद घेण्यात येईल. संबधीत वार्डाचे कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या वार्डात लक्ष द्यावे. कच्चे टिपन ठेवावे. दोषी आढळल्यास त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. वार्ड अभियंत्यांनी योग्य ते नियोजन ठेवावे. लाईटबाबतच्या अहवालाची माहिती दररोज सादर करण्यात यावी. वार्ड निहाय विवरणपत्रात नमुद केलेल्या माहितीप्रमाणे विवरण भरून देण्यात यावे. त्यात किती लाईट सुरू आहे बंद आहे. नादुरूस्त आहे. रात्री किती चालु किती बंद याबाबतची माहिती नमुद करायची आहे. सदरची माहिती फक्त वार्ड क आणि फ यांची आलेली आहे. जी माहिती आली त्यात उदा.वार्ड 21 मध्ये बंद 44 चालू 6, वार्ड 22 मध्ये 10 बंद चालू 5, एन-1 मध्ये 5 बंद 6 चालू सदरील रिपोर्ट एक दिवसाचा आहे वास्तविक सदरील रिपोर्ट संबधीत अधिकारी तसेच शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे मार्फत यावा परंतु रिपोर्ट दररोजचा दिला पाहिजे होता. परंतु तसे झालेले नाही. मिसारवाडी 30 स्वीस चालू होते ते बंद केले. नारेगांव 16 बंद केले उपअभियंता, कनिष्ठ अभियंता,कार्यकारी अभियंता मार्फत रोज अहवाल यावा.. संबधीत कंत्राटदाराला बोलावुन सक्त ताकीद देण्यात आली होती. बिलाच्या देयकाबाबत नंतर पहाण्यात येईल प्रथमतः लाईट दुरूस्त करण्यात यावे. चार दिवसांमध्ये लाईट सुरू केल्यास बिल अदा केले जाईल असे सांगण्यात आले. परंतु दुर्देवाने काहीच सुधारणा झाली नाही. कारवाई करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.आयुक्तांनी माहिती दिली आहे. संबधीत अधिकारी यांनी खोटी माहिती दिलेली आहे. काय कार्यवाही करणार.

मा.सभापती :जी माहिती समोर आलेली आहे,त्यावर कुणालाच संशय घेण्याची गरज नाही.
(याच वेळी अनेक स.सदस्य एकत्रित बोलतात.)

मा.सभापती :बी.ओ.टी.वरील तसेच कंत्राटी पध्दतीने विद्युतीकरणाचे कामे दिलेली आहेत. ते सर्व फेल झालेले असुन मनपाच्या वतीने पुर्वी प्रमाणे चालविण्यात यावे नसता ताबडतोब सदरची निवीदा रद्द करून नविन निवीदा काढण्यात यावी नसता आठ दिवसांत खुलासा करण्यात यावा. (लाईट) विद्युतीकरण या विषया बाबत तात्काळ बैठक आयोजित करण्यात यावी.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :लाईट आणि इतर विषयांचे जे मुद्दे मांडण्यात आले त्यात वार्डात इंजिनिअर कमी प्रमाणात आहे काम जास्त आहे याबाबतचे शहर अभियंता यांनी वार्डात जावुन योग्य ते नियोजन ताबडतोब करण्यात यावे. यास उपआयुक्त (म) आणि माझी ताबडतोब मंजूरी देण्यात येईल. |
| मा.सभापती | :ज्या ठिकाणी वार्डात अशी परिस्थिती आहे त्या ठिकाणी अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता आहे त्याप्रमाणात प्रशासनाने तेथे अधिकारी/कर्मचारी देण्यात यावे. |
| श्री.अमित भुईगळ | :अधिकारी हे स.सदस्यांचे फोन घेत नाही. फोन ॲटेंन्ड केले पाहिजे. |
| मा.सभापती | :स.सदस्यांचे फोन ॲटेंन्ड केले पाहिजे नगरसेवक स्वतः च्या कामासाठी फोन करित नाही. जर फोन ॲटेंन्ड करीत नसेल तर संबधीत अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात यावी. मा.आयुक्त हे नेहमी व्यस्त असतात मात्र इतर अधिकारी यांनी त्यांचे फोन सुरू ठेवायला हवेत अटेंन्ड करायला पाहिजे. |
| मा.आयुक्त | :काही वेळेस फोन स्कीप होत असतील मीटींगमध्ये असेल तर बाजुला ठेवतो. वाजत असतो. मिटींग सोडून मी फोन उचलत नाही. दिवसभरात अनेक फोन उचलतो परंतु असेही आहे की, दिवसभर फोन उचलायचे की काम करायचे हा एक प्रकार. |
| मा.सभापती | :आपण आयुक्त आहात. सर्व नगरसेवक असतील इतर फोन तान होत असेल बाकीचे अधिकारी शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, त्यांची लाइनमन, पाणी सोडणारे कर्मचारी ते फोन घेत नाही. |
| मा.आयुक्त | :मी सर्व अधिकाऱ्यांना 16 तारखेला असेच सांगितले आहे की, यानंतर कोणाची फोन उचलला नाही म्हणून तक्रार आली, 24 तास काही फोन जवळ राहत नाही पण सूचना दिल्या आहेत. स.सदस्यांने मीस कॉल असला तरीही त्यास रिप्लाय दिला जाईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :अचानक काही तक्रारी उद्‌भवतात. |
| श्री.अमित भुईगळ | :आजच प्रशासकीय अधिकारी यांनी स.सदस्य श्री.मिलिंद दाभाडे यांचा फोन घेण्यात आला नाही. 4 वेळा त्यांनी फोन केला. फोन घेतला नाही. खुलासा करण्यांत यावा. |
| मा.सभापती | :यानंतर असे होणार नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :मा.आयुक्त यांना काही अडचणी असल्यास त्यांचे स्विय सहाय्यक यांना तक्रारी सांगण्यात येतील त्या आपल्यापर्यंत पोहचतील. |
| श्री.मधुकर सावंत | : जालना रोडवर झोन नंबर 4 ला लागून एक एकरमध्ये बेकायदेशीररित्या स्टीलचे स्ट्रक्चर उभे केले जात आहे. महानगरपालिकेस साधारणत:30 लाख रूपये उत्पन्न प्राप्त झाले असते.संबधीत अधिकारी यांना याबाबत 3-4 दिवसापूर्वी पासून माहिती दिलेली आहे. अनाधिकृत बांधकाम चालू आहे.त्या ठिकाणी रांत्रदिवस बेकायदेशीर काम चालू आहे. मा.सभापती यांना विनंती करण्यात येते की, सभागृह थांबवा. मा.आयुक्त आणि संबधीत अधिकारी यांना सदरील जागेची पहाणी करण्यास पाठवावे एक एकरमध्य स्टिलचे मोठे कारचे शोरूम उभे केले जात आहे. अधिकारी यांनी याकडे दुर्लक्ष केलेले आहे महानगरपालिकेस 30 लाखाचे उत्पन्न प्राप्त झाले असते. |

| | |
|---|---|
| श्री.विकास जैन | :प्रशासकीय अधिकारी यांना याबाबबत माहिती आहे काय? |
| श्री.मधुकर सावंत | :सर्वांना माहिती देण्यात आलेली आहे. सदरील ठिकाणी उपआयुक्त यांना पहाणीकरीता पाठविण्यात यावे. उपआयुक्तांना माहीती आहे. |
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| उपआयुक्त(सिडको) | :जालना रोडवर मोतीवाला कॉम्पलेक्स वार्ड ड शेजारी आहे. त्या ठिक्ाणी मी 27 तारखेला गेलो होतो. मला स.सदस्य श्री.मधूकर सावंत यांचा 25 तारखेला फोन आला त्यांनी सांगितले की, तेथे बेकायदेशीर बांधकाम होत आहे. 25 तारखेला इमारत निरीक्षक श्री.जमशीद हे जाऊन आले व त्यांनी मालकी हक्कासंदर्भात नोटीस देण्यात आलेली आहे. त्यात तिन दिवसांची मुदत देण्यात आली होती. 27 तारखेला पहाणी करण्याकरीता कागदपत्र मागणीसंदर्भात गेलो असता अर्ध्यातास थांबण्यास सांगीतले व एक रजिष्टर दाखविण्यात आले की, मनपाच्या नांवे कागदपत्र रजिष्टर पोस्ट केलेले आहे म्हणुन सांगण्यात आले. वास्तविक सर्व कागदपत्र साईडवर ठेवायला पाहिजे होते ते ठेवण्यात आलेले नव्हते. 27 तारखेला मालकी हक्काच्या नोटीसची मुदत संपत होती व त्यानंतर दोन दिवस सुट्टी आली. आज संबधीत बी.आय.ला पुढील कारवाईसाठी नोटीस इश्यु करण्यास सांगण्यात आलेले आहे व त्याची पुर्तता करीत नसेल तर बांधकाम पाडण्यात येईल पुढील कार्यवाही करण्यात येईल. जे काही प्रोसेस त्या प्रमाणे पुढे जाणार. |
| श्री.मधुकर सावंत | :मनपाचे अधिकारी त्या ठिकाणी गेल्यानंतर संबधीताने रात्रंदिवस काम सुरू केलेले आहे. जवळपास काम पुर्ण होत आहे. |
| उपआयुक्त (सिडको) | :संबधीत ठिकाणचे फोटो काढण्यात आलेले आहे. बांधकामात काही बदल केला असेल. |
| श्री.विकास जैन | :बांधकामाला परवानगी आहे काय? |
| उपआयुक्त (सिडको) | : कागदपत्र समोर आलेले नाहीत. |
| श्री.अमित भुईगळ | :टाऊन प्लॅनिंगचा खुलासा घेण्यात यावा. परवानगी दिली का नाही. |
| प्रशासकीय अधिकारी | :उपआयुक्त आणि मी सदरील जागेची पहाणी करण्याकरीता गेलो होतो सदरील ठिकाणी पत्र्याचे शेड उभे राहत आहे. नोटीस देण्यात आलेली आहे सदरील नोटीसप्रमाणे त्यांनी आज दखल घेतली नाहीतर उद्या कारवाई करण्यात येईल. बांधकाम पुर्णतः तोडण्यात येईल. रात्री काम करित असेल तर माहित नाही. दिवसा काम थांबविण्यात आलेले आहे. |
| श्री.मधुकर सावंत | :रात्रीचे काम सुरू आहे तसेच दिवसाही काम चालू आहे. |
| श्री.अमित भुईगळ | :टाऊन प्लॅनिंगची परवानगी आहे काय? संबधीतास विचारणा करण्यात आली होती का? संधी का देण्यात आली. |
| प्रशासकीय अधिकारी | : नगर रचना विभागाचा अभिप्राय घेण्यात येत आहे. |
| श्री.विकास जैन | :संबधीत विभागाने खुलासा करण्यात यावा. अभिप्राय कशासाठी घेत आहे.<br>(याच वेळी सभागृहात अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात) |
| श्री.रेणुकादास वैद्य | :नोटीस देण्याची गरज नव्हती ते बेकायदेशीर बांधकाम आहे. उस्मानपुरा येथील अतिक्रमण काढले त्यावेळेस नोटीस दिली नाही. |
| श्री.मधुकर सावंत | :नोटीस देण्याची गरज नव्हती. |

श्री.अ.साजेद अ.सत्तार :तीन मुद्दे समोर आलेले आहेत. मालकी हक्काची नोटीस दिलेली आहे. टि.पी.विभागातुन परवानगी घेतली किंवा नाही. तिसरा मुद्दा सदरील ठिकाणी बांधकाम चालु आहे किंवा नाही. मी सभापती असतांना रोशनगेट येथे हबीबउद्दीन नावाचा व्यक्तीने दोन बेकायदेशीर इमारती तयार केलेल्या आहेत.एक महानगरपालिकेच्या ओपनस्पेसमध्ये तयार केली. महापालिकेच्या जागेमध्ये कटकट येथे अनाधिकृत इमारतीचे बांधकाम झालेला आहे. प्रशासकीय अधिकारी यांचेकडे तक्रार केली असता त्यांनी तात्काळ जिन्सी पोलीस ठाणे येथे संबधीताविरूध्द गुन्हा दाखल केला. जिन्सी पोलीस ठाण्यातील चार्जशिट मा.न्यायालयात रवाना केली. त्या आधारे स्टे लावण्यात आला. जिन्सी पोलीस स्टेशन येथे मनपाचे संबधीत अधिकारी यांनी पंचनामा करून केस दाखल केली. त्यात कागदपत्रे नमुद आहे. सध्या सदरील इमारतीची पहाणी करण्याकरीता मा.सभापती आणि सर्व स.सदस्य यांनी सोबत यावे. सदरील इमारतीला कलर झालेला आहे. सदरील ठिकाणी संबधीत व्यक्ती राहण्यासाठी गेलेले आहे. संबधीत इमारत निरीक्षक याने रूपये दोन लाख घेतले आहे. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिष्टर्ड आहे. मा.न्यायालयात केस चालू आहे मा.न्यायालयाचा कुठलाही मनाई हुकूम नाही. याबाबतीत इमारत निरीक्षक यांना माहिती देण्यात आली होती याच केसमध्ये प्रशासनाने इमारत निरीक्षक श्री.शेख यांना निलंबीत करण्यात आले होते. सदरील इमारत पुर्णअवस्थेत उभी आहे. प्रशासन जोपर्यंत संबधीत इमारत निरीक्षक यांना निलंबीत करत नाही तोपर्यंत सभा चालू देणार आहे. पहाणी करण्याकरीता प्रशासनाने व सभापती यांनी सोबत यावे.

श्री.अमित भुईगळ :संबधीत प्रशासकीय अधिकारी महापालिकेच्या बाहेर नाही. टाऊन प्लॅनिंग आणि प्रशासकीय विभाग आजुबाजूला आहे.फोनवर विचारू शकतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :याच प्रकरणामध्ये मा.सभापती यांना पत्र दाखविण्यात आलेले आहे. अगोदर मला सांगण्यात आले की, त्यांनी परवानगी घेतली असेल. टि.पी. विभागाकडून खुलासा घेण्यात यावा. संबधीत अधिकारी यांनी खुलासा केला की, महानगरपालिकेने परवानगी दिलेली नाही. ओपन स्पेसची कधी परवानगी देणार टाऊन प्लॅनिंग विभागाचा अभिप्राय आलेला आहे त्यांनी परवानगी दिलेली नाही, गुन्हा दाखल झाला. ज्या ठिकाणी स्टे आहे तिथे कार्यवाही होत नाही. जिथे स्टे नाही तिथे कार्यवाही होते. टाऊन प्लॅंनिंगने परवानगी दिली किंवा नाही हा प्रश्न आहे. त्यास नोटीस दिली जाते. पैसे घेवुन कागदपत्रांची.

श्री.मधुकर सावंत :आदेश देण्यात यावे की, तात्काळ काम काढण्यात यावे.

श्री.अमित भुईगळ :तात्काळ काढण्यात यावे व प्रशासकीय अधिकारी यांना बोलावून करण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मनपा परवानगी देतांना त्यात नमुद केले आहे की, मनपा अधिकारी संबधीत बांधकाम जागेवर आल्यास बांधकाम परवाना दाखविण्यात यावा. परंतु प्रशासनाने संबधीतास बांधकाम परवाना बाबत विचारणा केली नाही. कागदपत्रांची नोटीस देण्यात आली. ज्या ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम चालू

असतांना कागदपत्रांची नोटीस दिली जाते. परवानगी का विचारणा करण्यात आली नाही.

श्री.अमित भुईगळ :वेळ कशासाठी दिला. या ठिकाणी पैशाचा गैरव्यवहार झालेला आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी या ठिकाणी पैशाचा गैरव्यवहार केला आहे. प्रशासकीय अधिकारी यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

(याच वेळी स.सदस्य श्री.अ.साजेद अ.सत्तार मा.सभापती यांच्या आसना समोरील भागात उभे राहून संबधीत कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत सांगतात)

श्री.अ.साजेद अ.सत्तार :निलंबित करणार की नाही?

श्री.मधुकर सावंत :जागेवर बसायला सांगा?

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी या प्रकरणात कुठली कार्यवाही करणात त्याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासकीय अधिकारी यांचेकडून असा खुलासा घेण्यात यावा की, श्री.हबीबोद्दीन यांचे विरूध्द त्यांचे सहीनीशी गुन्हा दाखल झाला होता किंवा नाही. तसेच विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घेण्यात यावा कि, त्या इमारतीवर कोर्टाचा काही मनाई हुकूम आदेश होता किंवा नाही. नसतांना का कारवाई होते. वर्तमानपत्रात बातमी आहे की, जानेवारी 2010 मध्ये यासंबधीचा स्थायी समितीचा ठराव रद्द केलेला आहे. त्यावर आज कार्यवाही झालेली आहे. जानेवारी 2010 मध्ये कार्यवाही का होत नाही. गुन्हा दाखल आहे किंवा नाही. गुन्हा दाखल झाल्यानंतर जे आदेश दिले होते त्यानंतर तेथे 80 टक्के जास्तीचे काम झालेले आहे. विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, स्टे आहे किंवा नाही. श्री.परदेशी यांचे इथे स्टे असतांना प्रशासन कारवाईसाठी त्या ठिकाणी जाते. एका सदस्यांनी अनाधिकृत मांस विक्रीबाबतचा प्रश्न काढले होते. त्यात स.सदस्य श्री.सुरे यांना 18 दिवस कोठडीत राहावे लागले. अधिकाऱ्यांना याचे काही वाटत नाही.

मा.सभापती :प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा की सदरील इमारतीची बांधकामाची पुर्वीची आणि आजची स्थिती काय आहे? प्रशासकीय अधिकारी यांनी गुन्हा दाखल केला की, नाही.

प्रशासकीय अधिकारी :श्री.सय्यद हबीबोद्दीन यांचे बांधकाम रहिवाशी क्षेत्रात आहे. तो पुर्ण एरिया illegal आहे. संबधीताचे बांधकाम illegal आहे. मध्यंतरी प्रशासकीय अधिकारी पदाचा चार्ज आला त्यावेळी स.सदस्य सभापती होते. त्यांनी सांगितल्या सांगितल्या तक्रारीवरून बारा तासांच्या आत FIR नोंदविण्यात आले होते. माझ्याकडील चार्ज गेल्यानंतर सदरील इमारतीचे बांधकाम होत गेले. मा.न्यायालयाचा तात्पूरता स्टे आला. प्रशासकीय विभागाने जेव्हा जेव्हा पोलीस बंदोबस्ताची वेळोवेळी मागणी् केली आहे कारण त्या विभागात काम करतांना पोलीस बंदोबस्त आवश्यक असते. पोलीस विभागाला कमीत कमी 3-4 वेळेस पत्र दिले. बंदोबस्त मिळाल्यास 100 टक्के कार्यवाही करण्यात येईल. कार्यवाही करणाऱ्यांत मी सुध्दा शामील आहे. जेव्हा जेव्हा illegall

इमारतीवर कारवाई करायची झाल्यास दहा इमारतींवर कारवाई करावी लागेल. एकाच बिल्डींगवर कार्यवाही करून चालणार नाही.

**मा.सभापती** :सदरील कारवाईसाठी कोणी थांबविले आहे. संबधीत इमारत निरीक्षकाने काम चालु आहे म्हणून अहवाल सादर केलेला आहे का?

**प्रशासकीय अधिकारी** :पंचनामा केल्यावर काम चालु असल्याचे फोटो आहे त्यांनी काम चालू आहे असे केले होते.

**मा.सभापती** :त्यावेळेसच कारवाई का नाही केली.

**प्रशासकीय अधिकारी** :संबधीत इमारत निरीक्षक श्री.शेख यांना त्यावेळेस निलंबीत करण्यात आले होते. माझा चार्ज झाल्यानंतर आसपास पुढील कार्यवाही झालेली आहे. त्यांनी पंचनामा केला होता. ही कार्यवाही त्या स्थरावर होत नाही. इमारतीवर कारवाईसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त असणे आवश्यक असतो. सध्या स्थितीत मा.न्यायालयाचा काय अहवाल आहे याची माहिती नाही. मा.न्यायालयाची स्थगीती नसेल व आवश्यक तो पोलीस बंदोबस्त मिळाल्यास आम्ही 100 टक्के कार्यवाही करण्यास बांधील आहोत.

**श्री.अ.साजेद अ.सत्तार** :काय कार्यवाही करणार निलंबीत झाल्यावर 2 लाख घेवून पुर्ण इमारत उभी झालेली आहे. विधी सल्लागार यांचा खुलासा घेण्यात यावा मा.न्यायालयाचा बांधकामावर स्टे असल्यास पदाचा राजीनामा देण्यात येईल. काय कार्यवाही होणार स्टेचा खुलासा करावा.

**मा.सभापती** :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार** :सदरील प्रकरणी मा.न्यायालयात दिवाणी न्यायालयात कुठलाही दावा दिसुन येत नाही. फौजदारी स्वरूपाची कारवाई संबधीत विभागाकडुन होते त्यामुळे याबाबतची माहिती मी देऊ शकत नाही.

**श्री.अ.साजेद अ.सत्तार** :श्री.शेख यांना निलंबीत करावे. जे दोषी असतील त्यांना निलंबित करावे.

**श्री.मधुकर सावंत** :90 ठिकाणी कसलाही पोलीस बंदोबस्त नसतांना आपण अतिक्रमण काढु शकतो. इथे एका मालकाचा इंट्रेस्ट. जालना रोड ठिकाणी काढण्यास काय हरकत आहे. परवानगी नाहीच.

**मा.सभापती** :मा.आयुक्त याबाबतीत खुलासा करतील.

**मा.आयुक्त** :इमारत निरीक्षक यांना निलंबीत करण्यात आले होते. सेशन कोर्टाला जे कागदपत्र आम्ही दाखविले होते ते रिस्टेट करण्यात आले. मा.न्यायालयात केस नसतांना आणि त्यानंतर इमारतीचे बांधकाम झालेले असेल तर तो दोषी समजला जाईल. एकदोन दिवसात चौकशी करून पुढची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.अ.साजेद अ.सत्तार** :खोटी माहिती देत असेल तर माझा राजीनामा घेण्यात यावा. प्रशासकीय अधिकारी खोटे बोलत असेलतर त्यांना निलंबित करा. गरीबांचे अतिक्रमण काढण्यात येते. जेथे स्टे आहे तेथे 400 लोक घेवुन जातात. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त मिळतो कारवाई होते. आपण निलंबीत केले नाही तर प्रशासनावर कार्यवाही करावी. न्यायासाठी कुणाकडे जावे. आमची माहिती खोटी असल्यास कारवाई करण्यात यावी. आपणांस निर्णय घ्यावा लागेल.

योग्य ती कार्यवाही करण्यात यावी नसता सभा चालू देणार नाही. माझ्यावर गुन्हे दाखल केले तरी चालेल.

मा.सभापती :त्यांच्या उपस्थित इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले कलर झाले त्यावेळेस इमारत निरीक्षक काय करत होते. त्यांचा इंटरेस्ट असेलतर बरोबर कार्यवाही होते. प्रशासकीय अधिकारी असेल किंवा नसेल परंतु संबधीत झोनला इमारत निरीक्षक दिलेला आहे.

श्री.अमित भुईगळ :20-20 वर्ष झाले तेथे काम करतात. त्यांनी का विशेष पदवी घेतली आहे का. मा.आयुक्तांना पत्र दिलेले आहे की, सर्व इमारत निरीक्षक यांचे बदल्या करण्यात याव्या. तरीपण बदल्या करण्यात आले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष पहाणी करावी माझ्या सोबत चला. मनपाच्या ओपन स्पेसवर तीन मजली इमारतीचे बांधकाम झालेले आहे. प्रशासकीय विभाग साक्ष आहे. कलर चालू आहे. एक मंत्री महोदयाच्या घरासमोर काम चालु आहे. कार्यवाही करणार का?

मा.सभापती :मा.आयुक्तांनी तात्काळ माहिती घेऊन तात्काळ निलंबनाची कार्यवाही करावी. सभा संपल्यानतर सर्व विभागांना बोलावून विचारणा करावी. स.स.श्री.मधुकर सावंत यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर जालना रोड येथील झोन क्रमांक 4 च्या शेजारी बांधकाम सुरू आहे ते तात्काळ थांबवावे. बांधकाम परवानगी नसल्यास प्रशासकीय अधिकारी उपआयुक्त आणि संबधीत अधिकारी यांनी तेथे जावे काम थांबवावे व दोन दिवसात पाडावे. परवानगी नसेलतर कोर्टात जाण्याची संधी देवु नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :वार्ड नंबर 28 मध्ये सन 1983 मध्ये एक ले आऊट मंजूर झाले होते. सन 1998मध्ये रिवाईज झाले. मनपाच्या ओपनस्पेसवर अतिक्रमण करण्यात आले होते. मा.आयुक्तांना विनंती केल्यानंतर त्यांनी सदर जागेची पहाणी केली कामाची मंजूरी झाली मनपाने 40 लाख रूपये ओपनस्पेसवर खर्च केले आहे. सन 1983 ते आजपर्यंत दोन ओपनस्पेस होते त्यातील एकावर पुर्णपणे अतिक्रमण झाले होते. जमीन मालकाने पीआर कार्डवर मनपाचे नांव नसल्याने जमीन विकुन टाकली. सध्या 40 लाख रूपये खर्च करून ओपनस्पेस तयार करण्यात आले त्यावर पुन्हा अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. लिजडिडवर मनपाच्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे 3200 स्के.मिटर ची लीजडिडच्या ऐवजी 32220 स्के.मिटरची लीजडिड झाली. जेवढा प्लॉट एरिया नाही त्याच्या दहा पट ओपनस्प्ेसची लीजडिड झाली. ज्या व्यक्तीने लीजडिड करून दिली ती व्यक्ती नाही. ओपनस्पेसबाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांना पी.आर कार्ड तयार करण्याबाबत सांगण्यात आले. दोन ओपनस्पेस मनपाचे रेडी झाले एक ओपनस्पेस विकुन टाकण्यात आला तेथील रहिवासी एकत्रित येवुन बैठक बोलावण्यात आली. मुळ मालकाचे जे वारसदार आहे. रहिवासी यांनी विनंती केली की, या जागेचे पी.आर.कार्ड मनपाच्या नांवावर हवे. ओपनस्पेसवर मनपाचे नांव देण्याबाबत आदेशीत करण्यात यावे.

मा.सभापती :तात्काळ महानगरपालिकेच्या नांवावर पी.आर.कार्ड बनुन घेण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सदफ कॉलनी बाबत आहे.

सहा.संचालक नगर रचना :स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत प्रत्यक्ष स्थळ पहाणी केलेली आहे. सन 1983 ला साडेपाच एकरचा ले आऊट मंजूर झालेला आहे. हक्क सोड पत्र त्यावेळेस केलेले आहे त्याच्यानंतर नामांतर झालेले नाही. आजही ओपनस्पेस महानगरपालिकेच्या नांवावर नाही. स्वकृत दर्शीनी लीजडिड चुकीचे झाले असे वाटते. तथापी पुर्ण लेआऊट आणि आजुबाजूची त्या मालकाची जागा हि साधारणत: 11 ते 12 एकर होते. त्याच्यावर काही ठिकाणी अनधिकृत विकास झालेला आहे.पाच ते साडेपाच एकरचा लेआऊट मंजूर झालेला आहे. लीजडिडची जागा आणि आत्ताची जागा जोपर्यंत मोजणी होत नाही. तो पर्यंत मनपाच्या नावांवर किंवा पी.आर.कार्ड करता येणार नाही. चौकशी करून किंवा मोजणी करून त्यानंतर करावे लागेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पुर्ण मोजणी करण्यात यावी.

मा.सभापती :ओपनस्पेसवर 40 लाख रूपये खर्च केलेला आहे ते कोणत्या आधारे केले.

उपअभियंता (इमारती) :जी मार्किंग आहे. टाऊन प्लॅनिंगचे अभियंते आणि आमच्या विभागाच्या अभियंत्यांने टाऊन प्लॅनिंग विभागाचा अभिप्राय घेतलेला आहे. प्रथमत: 36000 स्के.फुटाचा ओपनस्पेस अशी आहे. त्यानुषंगाने काम सुरू करण्यात आले. त्यात असे ओपीनीअन आले की, 10,000 स्के.फुट कमी आहे. तीन साईडने ओपनस्पेस कव्हर केलेले आहे आणि नॉर्थची बाजू बंद केलेली आहे. टेंडर लाइव्ह आहे 22 लाखाचे टेंडर आहे त्यातील 7 लाख खर्च केलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पी.आर कार्ड तयार करण्यात यावे.

मा.सभापती :तात्काळ नोंदणी करून सदफ कॉलनी येथील मनपाच्या मोकळया जागेचे पि.आर कार्ड तयार करण्यात यावे.

श्री.विकास जैन :बजेटबुक प्रमाणे इस्टीमेट मंजूरीला पाठविण्यात यावे. असे आदेशित करावे.

मा.सभापती :स्थायी समितीने अर्थसंकल्प 2010-2011 मध्ये जी नविन कामे प्रस्तावित केलेली आहे ती कामे लवकर व्हावे म्हणुन त्वरीत अंदाजपत्रके तयार करण्यात यावीत.

श्री.विकास जैन :मागील बैठकीत विषय क्रमांक 454 वर चर्चा झालेली असुन इतिवृत्त मंजूर झालेले आहे. त्यावर चर्चा होऊ शकली नाही. एक हॉल संस्थेला भाडे तत्वावर दिलेला आहे. रूलींग देत असतांना मा.सभापती म्हणुन श्री.अ.साजेद साहेब होते त्यांना मी पत्र दिले होते त्यांनी ती विनंती मान्य केली होती. त्याच पध्दतीने तो भाडे तत्वावर प्रती महा 1000/- रुपये सदरील संस्थेला भाडयाने हॉल द्यावे.

मा.सभापती :श्री.अ.साजेद अ.सत्तार सभापती असतांना चर्चा झालेली आहे ठिक आहे. मंजूर.

श्री.रेणुकादास वैद्य :अशाच प्रकारे माझ्या वार्डातील विषय आहे. मा.आमदार श्री.विलास अवचट साहेब यांचे निधीमधील जो हॉल बांधलेला आहे. गेल्या दिड वर्षापासुन मी पाठपुरावा करीत आहे. त्या संदर्भात ठराव मा.सर्वसाधारण सभेत झालेला आहे कारण नसतांना मालमत्ता विभागाकडुन मा.आयुक्तांकडे पाठविलेला आहे. सभागृहाने (आपण) पॉलिसी ठरविण्यांत यावी की, 1000

रूपये भाडे आणि जे काही हॉलची दुरूस्ती आहे ती सामाजिक संस्थेने करायची अशी पॉलीसी मा.सर्वसाधारण सभेने ठरविलेली असतांना स्थायी समितीने मान्यता दिलेली असतांना अद्यापपर्यंत त्याचे ॲग्रीमेंट झालेले नाही.

मा.सभापती :ठिक आहे, करण्यात येईल.

**विषय क्र. 19 :**

दिनांक 19/06/2010 (का.प.क्र.2), 19/06/2010 (का.प.क्र.3), 29/06/2010 ची तहकूब सभा (का.प.क्र.4), व 30/06/2010 (का.प.क्र.4), रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिति सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा.सभापती :मंजूर

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.आयुक्तांनी दिनांक 29.06.2010 रोजी सबमिशन केले होते त्याबाबतीत माहिती देण्यात यावी. विषय मंजूर करण्यात यावा त्यास विरोध नाही. विशेष अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी सांगण्यात आला असावा.

मा.आयुक्त :गणवेश खरेदीचा विषय होता. त्यासंदर्भातला जो जी.आर.नमुद करण्यात आला होता. खरेदीची कार्यपध्दती कशी असावी त्या संदर्भातला उर्जा व उद्योग विभागाचा सन 1992चा जी.आर आहे. सदरील जी.आरमध्ये दिनांक 08 डिसेंबर 2009 रोजी गणवेश खरेदी करण्यासंदर्भात काही सूचना add करण्यात आल्या असा तो खुलासा होता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.संजय पवार यांचे कार्यालयीन आदेश दिनांक 21.08.2010 रोजी लेखाअधिकारी म्हणुन दिलेले आहे. लेखाअधिकारी म्हणून कार्यरत असतांना त्यांचेवर ठपका ठेवलेला आहे. महापौर चषक 8 लाख 23 हजार , झाशीची राणी आणि जानता राजा 15 लाख 67 हजार, स्वामी विवेकानंद कार्यक्रम 11 लाख 20 हजार, अख्यान महाराष्ट्रासाठी 15 लाख या सर्वासाठी बैठक व्यवस्था, स्टेज डेकोरेशन, शासन निर्णय क्रमांक उद्योग व उर्जा क्रमांक दिनांक 02.01.1992 व शासन निर्णय दिनांक 16.07.1993 नुसार 50 लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर जाहिर निवादा काढणे बंधनकारक केलेले आहे परंतु आपण शासन निर्णयाचे तरतुदिचे पालन न करता आपल्या अधिकारात बे कायदेशीर पणे करता नियम बाहय 73 खंड (क) शासन पुर्तता न करता श्री.संजय पवार यांनी बेकायदेशीरपणे केलेले आहे. गणवेश खरेदी बेकायदेशीर केले. इतके आरोप असतांना त्यांना वाचविण्यासाठी हे करण्यात आलेले आहे का? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :विषय पत्रिका झाल्यावर हा विषय घेऊ.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :विषय पत्रिकेबद्दल आणि इतिवृत्ताबद्दल माझे काहीही म्हणने नाही. त्यांना वाचविण्यासाठी हे केलेले आहे का? जे इतिवृत्तांतात आहे ते खरे आहे का की आदेश खरे आहे. माझे म्हणणे खरे आहे.

मा.सभापती :विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक 19/06/2010 (का.प.क्र.2), 19/06/2010 (का.प.क्र.3), 29/06/2010 ची तहकूब सभा (का.प.क्र.4), व 30/06/2010 (का.प.क्र.4), रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. 20 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, अध्यक्ष, श्री.अण्णासाहेब मोरे, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ, त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांनी विनंती अर्ज देवून बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेची मोकळी जागा व हॉल भाडे तत्वावर मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

त्यानुसार सदरील ठिकाणच्या हॉलचे क्षेत्रफळ 41.7 चौ.मी. असून प्रती माह प्रती चौ.मी.210/- आकारणे योग्य. मा.स्थायी समिती सभेमध्ये मान्यता मिळाल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कर व इतर संलग्न कराचा भरणा करून व करारनामा करून घेणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विकास जैन :मागील बैठकीत विषय क्रमांक 454 वर चर्चा झालेली असुन इतिवृत्त मंजूर झालेले आहे. त्यावर चर्चा होऊ शकली नाही. एक हॉल संस्थेला भाडे तत्वावर दिलेला आहे. रूलींग देत असतांना मा.सभापती म्हणुन श्री.अ.साजेद साहेब होते त्यांना मी पत्र दिले होते त्यांनी ती विनंती मान्य केली होती. त्याच पध्दतीने तो भाडे तत्वावर प्रती महा 1000/- रुपये सदरील संस्थेला भाडयाने हॉल द्यावे.

मा.सभापती :श्री.अ.साजेद अ.सत्तार सभापती असतांना चर्चा झालेली आहे ठिक आहे. मंजूर.

श्री.रेणुकादास वैद्य :अशाच प्रकारे माझ्या वार्डातील विषय आहे. मा.आमदार श्री.विलास अवचट साहेब यांचे निधीमधील जो हॉल बांधलेला आहे. गेल्या दिड वर्षापासुन मी पाठपुरावा करीत आहे. त्या संदर्भात ठराव मा.सर्वसाधारण सभेत झालेला आहे कारण नसतांना मालमत्ता विभागाकडुन मा.आयुक्तांकडे पाठविलेला आहे. सभागृहाने (आपण) पॉलिसी ठरविण्यांत यावी की, 1000 रूपये भाडे आणि जे काही हॉलची दुरूस्ती आहे ती सामाजिक संस्थेने करायची अशी पॉलीसी मा.सर्वसाधारण सभेने ठरविलेली असतांना स्थायी समितीने मान्यता दिलेली असतांना अद्यापपर्यंत त्याचे ॲग्रीमेंट झालेले नाही.

मा.सभापती : ठिक आहे, करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अध्यक्ष, श्री.अण्णासाहेब मोरे, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ, त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांनी विनंती अर्ज देवून मागणी केल्यानुसार त्यांना बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेची मोकळी जागा व हॉल रू.1000 या दराने प्रति महिना भाडे तत्वावर देण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कर व इतर संलग्न कराचा भरणा करून व करारनामा करून घेणे यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 21 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या

मालकीच्या **कबाडीपुरा** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**कबाडीपुरा येथील व्यापारी संकुल** मधील एकुण ०६ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता दुकान क्र.१३ वगळता दुकान क्र.०७,०८,०९,१० आणि १५ साठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दु.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | ०७ | मो.जुनेद मो.जावेद | रू.१९६८/- | रू.२२००/- | |

---

| अ.क्र. | दु.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | ०८ | सौ.गयाबाई तुकाराम भाग्यवंत | रू.१९६८/- | रू.२५००/- | |

---

| अ.क्र. | दु.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | ०९ | सविता सत्यनारायण वाघमारे | रू.१०५०/- | रू.११०१/- | |

---

| अ.क्र. | दु.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | १० | सय्यद मजाज फारूकी | रू.१०५०/- | **रू.१२३१/-** | |
| **०२** | १० | सय्यद मुश्ताकोद्दीन | रू.१०५०/- | रू.१२००/- | |

---

| अ.क्र. | दु.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | १५ | हिना परवीन | रू.२१५१/- | रू.२३००/- | |
| ०२ | १५ | रिजवाना खान | रू.२१५१/- | निरंक | उघडलेली नाही |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अमित भुईगळ :दुकान क्रमांक 3 चा अहवाल आलेला आहे. दिनांक 16.08.2010 रोजी मुख्य लेखापरिक्षक यांनी अहवाल दिलेला आहे. श्री.देविदास चित्ते यांनी निवीदा दर रूपये 4285 प्रतिमहा मंजूर केला होता त्यांना अनामत रक्कम व करारनामा करण्यासाठी त्यांना दिलेले सर्वच पत्र दिले किंवा नाही याची खात्री

होत नाही तसे मो.शकील मो.शरीफ कबाडीपूरा यांना दिनांक 20.02.2010 रोजी अनामत रक्कम व इतरच्या भरणा करण्याचे पत्र देऊनही त्यांचा भरणा 95 दिवसाच्या नंतर केल्याचे दिसुन येते. अशासकीय प्रस्तावाद्वारे मा.स्थायी समितीने दिनांक 15.02.2010 रोजी मंजूर केलेले मो.शकील यांना 2400/-प्रतिमहा दर स्विकारण्याची एकुणच प्रकया संशयास्पद दिसुन येते. महानगरपालिकेचे एकुण प्रतिमहा 1885 एवढे म्हणजे एकुण 30 वर्षाचे 6,78,620/-व अनामत रक्कम 1885X12=22620/-एकुण 7,01,220/- एवढी प्रचंड आर्थीक नुकसान होत आहे. श्री.देविदास चित्ते यांना कबाडीपूरा येथील दुकान नंबर 3 मंजूर करतांना मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात आली होती परंतु श्री.मो.शकील दुकान नंबर 3 मंजूर करतांना मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली नाही. या प्रकरणी जे अधिकारी आहे त्यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती :यामध्ये महानगरपालिकेचे मोठयाप्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. याप्रकरणी संबधीत अधिकारी यांचेवर काय कार्यवाही करणार तसेच यामध्ये कोणकोणते अधिकारी दोषी आहे. याचा खुलासा मा.आयुक्त करतील. जे ठराव 30 वर्षासाठी येत आहे ते 03 वर्षासाठी करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :रिटेंडर करण्यात यावे.

श्री.अमित भुईगळ :रिटेंडर करण्यात यावे.

मा.सभापती :ज्या निवीदा किंवा जे याच्यामध्ये आलेले आहे व याच्या व्यतिरिक्त जे बाकी आहे व 30 वर्षासाठी दिलेले आहे ते रिटेंडर करण्यात यावे. यामध्ये संबधीत अधिकारी कोण आहेत खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : या संदर्भात मुख्यलेखापरिक्षक यांना चौकशी करण्यासाठी आदेशीत करण्यात आलेले होते. 18.08 रोजी त्यानुसार अहवाल सादर करण्यात आलेला आहे. अहवालामध्ये जे निष्कर्ष आहे त्यामध्ये तपशिलवार सर्व बाबी नमुद करण्यात आलेल्या आहे. यामध्ये शिफारश केलेल्या कबाडीपूरा येथील दुकान क्रमांक 3 याचे आर्थीक नुकसान होत असल्याने तातडीने रद्द करण्यात यावा. त्याचप्रमाणे नविन निवीदा तातडीने काढुन जास्तीच्या दराची निवीदा मान्य करून दुकान भाडयाने देण्यात यावे आणि यासंबधात मालमत्ता विभागाचे संबधीत अधिकारी आणि कर्मचारी यांची भुमिका खुलासा करून कार्यवाही करण्यात यावी. अशा प्रकारची शिफारशी दिलेल्या आहे. या शिफारशीच्या अनुषंगाने आत्ताचे उपआयुक्त यांना कार्यवाही प्रस्तावित करण्याचे सांगीतलेले आहे. हि कार्यवाही प्रस्तावित करून तातडीने कार्यवाही करणार आहे.

श्री.अमित भुईगळ :कोण दोषी आहेत. नांवे सांगण्यात यावे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांचे नांव सभागृहापुढे आले पाहिजे.

मा.आयुक्त :सिडको उपआयुक्त,तत्कालिन अधिकारी श्री.जावळीकर, मालमत्ता अधिकारी श्री.जाधव, श्री.रविंद्र निकम, कनिष्ठ लिपीक मोमीन जिलानी यांना प्राथमिक स्वरूपात जबाबदार धरून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.अमित भुईगळ :सदरील अधिकारी यांचेवर कुठली कार्यवाही करणार आहे.

मा.सभापती :जे अधिकारी यामध्ये दोषी आढळलेले आहे व मा.आयुक्तांनी सभागृहामध्ये नांवे जाहिर केलेले आहे. संबधीत अधिकारी खरेच दोषी असतील तर त्यांचेवर पुढील बैठकीत निलंबनाची कार्यवाही प्रास्तवित करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या कबाडीपुरा व्यापारी संकुलातील एकूण 06 दुकानापैकी दुकान क्रं.13 वगळता दुकान क्र.07 ते 10 आणि 15 ही दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी प्राप्त झालेल्या अति उच्च निविदा धारकाचे नांवाने त्यांच्या नांवासमोर निविदेत दर्शविलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.5/- प्रमाणे, अकृषीक कर रू.7.68 प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाड्याच्या बारापट प्रमाणे आकारून तीन वर्षाकरीता सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 22 :**

मा.आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **पिया मार्केट तळ मजला येथील** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन/बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**पिया मार्केट तळ मजला येथील व्यापारी संकुल** मधील एकुण ०२ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दु.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | ३० | अरविंददास गोविंददास पंडीत | रू.७२०/- | --- | उघडली नाही |
| ०२. | ३० | मो. रईसोद्दीन | रू.७२०/- | --- | उघडली नाही |
| ०३. | ३० | गोपाळ चऱ्हाटे | रू.७२०/- | **रू.७२३/-** | -- |
| ०१. | ३१ | विनायक कापकर | रू.७२०/- | --- | उघडली नाही |
| ०२. | ३१ | मो. रईसोद्दीन | रू.७२०/- | --- | उघडली नाही |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावा समोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे,अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत :विषय क्रमांक 22 सादर केला आहे. पिया मार्केट मधील दु.क्र.30, 31 टेंडर काढले आहे बाकीचे का नाही काढले.

श्री.रेणुकादास वैद्य :बाकीच्या दुकानाचे टेंडर का नाही काढले.

श्री.मधुकर सावंत :आणखी 8 दुकाने रिक्त आहे.

श्री.मधुकर सावंत :दुकान नंबर 18 ते 23 आणि 27,28 रिक्त आहे.

मा.सभापती :जास्तीत जास्त दर येतील त्या दराचा विचार करून देण्यात यावे. पिया मार्केटच्या निवीदेमध्ये जे जास्तीचे दर आलेले आहे त्या दराने रिक्त दुकानांची मागणी केलेल्यांना सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यात यावे. जाहिरात देण्यापैक्षा निवीदेतील प्राप्त जास्तीचे (Highest) दर दराप्रमाणे त्यांना दुकाने भाडे तत्वावर देण्यात यावीत. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या पिया मार्केट तळ मजला येथील व्यापारी संकुलातील गाळे भाडे तत्वावर देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार दुकान क्रमांक 30 साठी रक्कम रू.723/- मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे निविदेतील इतर अटी-शर्ती प्रमाणे सेवाशुल्क, अकृषीक कर आणि अनामत रक्कम आकारून तीन वर्षाकरीता श्री.गोपाळ चऱ्हाटे यांना सदरील दुकान भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पिया मार्केट तळमजला व्यापारी संकुलच्या निविदेमध्ये जे जास्तीचे (Highest) दर आलेले आहे त्या दराने रिक्त दुकान नंबर 18 ते 23 आणि 27 व 28 या दुकानांची मागणी केलेल्यांना सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 23 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **पिया मार्केट पहिला मजला येथील** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**पिया मार्केट पहिला मजला येथील व्यापारी संकुल** मधील एकुण ०५ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र.१७ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीम.प्राजक्ता यशवंत कांबळे | रू.३६०/- | ----- | अप्राप्त |
| ०२ | श्री.धनंजय कुलकर्णी | रू.३६०/- | रू.१०००/- | --- |
| ०३. | श्री.विनायक ढोकरट | रू.३६०/- | रू.१०७१/- | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | श्री.राजू पुंजाजी मिसाळ | रू.३६०/- | ---- | नि.उ.ना. |
| ०५. | श्री.जावेद शेख | रू.३६०/- | रू.१०१०/- | --- |
| **०६.** | **श्री.भाऊसाहेब रायभान काळे** | **रू.३६०/-** | **रू.२००१/-** | --- |
| ०७. | श्री.विनोद तोलारामानी | रू.३६०/- | रू.९६०/- | ---. |
| ०८. | श्री.पंकज जैस्वाल | रू.३६०/- | रू.१८५१/- | --- |
| ०९. | श्री.संदिप भुजबळ | रू.३६०/- | रू.६१३/- | --- |
| १०. | श्री.सिद्दीकी जहीर | रू.३६०/- | रू.७८८/- | --- |
| ११. | श्री.अनिल भिमराव चव्हाण | रू.३६०/- | रू.७०१/- | -- |
| १२. | श्री. पल्लवी साहेबराव बोर्डे | रू.३६०/- | रू.८०८/- | --- |
| १३. | श्री. योगेश शांतीलाल तुरे | रू.३६०/- | रू.१५००/- | -- |

**०२. दुकान क्र.२७ (महिलांसाठी राखीव)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती रुपा कंठे | रू.३६०/- | रू.८७१/- | -- |
| ०२. | श्रीमती अजमत अंजुम | रू.३६०/- | रू.७८६/- | -- |
| **०३.** | **श्रीमती किरण जैस्वाल** | **रू.३६०/-** | **रू.१४००/-** | -- |
| ०४. | श्रीम.सिद्दीकी असपिया जहीर | रू.३६०/- | रू.७१०/- | -- |

**०३. दुकान क्र.२९ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **श्री. पटेल ए. एम.** | **रू.३६०/-** | **रू.१०००/-** | -- |
| ०२. | श्री. स.नईम स. हुसेन | रू.३६०/- | रू.७८६/- | -- |
| ०३ | श्री. आमेर अन्सारी | रू.३६०/- | रू.७७७/- | -- |
| ०४. | श्री. विवेक शिवाजीराव तौर | रू.३६०/- | ---- | अप्राप्त |
| ०५. | श्री. राजेंद्र मुगदिया | रू.३६०/- | --- | नि.उ.ना. |

**०४. दुकान क्र.३० (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **श्री. पटेल ए. एम.** | **रू.३६०/-** | **रू.१०००/-** | -- |
| ०२. | श्री. स. नईम स. हुसेन | रू.३६०/- | रू.७८६/- | -- |
| ०३. | श्री. संजय फतेलष्कर | रू.३६०/- | रू.९०५/- | -- |
| ०४. | श्री. संजय बाळाजी आहिरे | रू.३६०/- | रू.६००/- | -- |
| ०५. | श्री. आमेर अन्सारी | रू.३६०/- | रू.८०७/- | -- |
| ०६. | श्री. विवेक शिवाजी तौर | रू.३६०/- | --- | अप्राप्त |
| ०७ | श्री. राजेंद्र मुगदिया | रू.३६०/- | -- | नि.उ.ना. |

**०५. दुकान क्र.३१ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. धनंजय कुलकर्णी | रू.३६०/- | रू.४००/- | -- |
| ०२. | श्री. स. नईम स. हुसेन | रू.३६०/- | रू.७८६/- | -- |
| **०३.** | **श्री. संजय फतेलष्कर** | **रू.३६०/-** | **रू.८०५/-** | -- |
| ०४. | श्री. विवेक शिवाजीराव तौर | रू.३६०/- | -- | अप्राप्त |

परंतु दुकान क्र.१७ ही यापूर्वी श्री.मो. फकरोद्दीन मो. इसाकोद्दीन यांना जाहिर लिलावाद्वारे भाडेतत्वावर देण्यात आलेली होती त्यापोटी संबंधीताने अनामत रक्कम रू. ५,०००/- अधिक रू.९४००/- अशी एकुण रू.१४,४००/- एक वर्षाचे आगाऊ भाडे रक्कम रू.७३३२/- असे एकुण रू.३६,१३२/- या कार्यालयात भरणा केलेला होता. परंतु संबंधीताने करारनामा करुन न दिल्यामुळे सदरील दुकान ताब्यात घेऊन त्याची फेरनिविदा काढण्यात आली असता संबधीताने अर्ज देऊन विनंती केली आहे की, काही अपरिहार्य कारणास्तव सदरील दुकानाचा भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेला नाही. तसेच सदर प्रकरणी मा.महापौर यांनी शिफारस केलेली आहे की, संबंधीताने यापूर्वी आपल्या कार्यालयात अनामत रक्कम, एक वर्षाचे आगाऊ भाडे भरणा केलेला आहे. तेंव्हा सदरील दुकानासंदर्भाने माहे मे २०१० मध्ये काढलेली जाहिर निविदा (दुकान क्र.१७ ची) रद्द करुन संबधीत अर्जदाराचे नावाने भाडेपट्टा करारनामा करुन देऊन त्यांना दुकानाचा ताबा देण्यात यावा.

तथापी संबंधीताकडे सन २००६ ते २०१० पर्यंतची थकबाकी रक्कम रू.२९३२८/- सह नव्याने प्राप्त झालेल्या निविदेतील सर्वोत्तम रक्कम रू.२००१/- या दराप्रमाणे सदरील दुकान भाडेतत्वावर घेण्यास संमती दर्शवलेली आहे. तथापी सदर दुकान क्र.१७ ही श्री.मो.फकरोद्दीन मो. इसाकोद्दीन यांना भाडेतत्वावर दिल्यास महानगरपालिकेस यापूर्वी रक्कम रू.३६,१३२/- प्राप्त झालेले असून थकबाकीपोटी प्राप्त होणारी रक्कम रू.२९३२८/- आणि अनामत मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे रक्क्कम रू.२४,०१२/- (वजा पूर्वी भरलेली अनामत रू.१४,४४०/-) म्हणजे रू.९५७२/- व वाढीव दराने एक वर्षाचे आगाऊ भाडे रक्कम रू.२४०१२/- सेवाशुल्क रू.४३२/- अकृषीक कर रू.५५/- असे एकुण रू.१,२७,४४०/- चा महानगरपालिकेचे उत्पन्न वाढू शकेल.

करीता सदरील व्यापारी संकुलातील दुकान क्र.१७ ही श्री.भाऊसाहेब रायभान काळे यांची निविदेतील नमूद रक्कम रू.२००१/- सर्वोच्च असल्याने त्यांचेकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे पोटी रू.२४,०१२/- सेवाशुल्क रू.४३२/- अकृषीक कर रू.५५/- आणि मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे रक्कम रू.२४,०१२/- असे एकुण रक्कम रू.४८,५११/- चे महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल तेंव्हा दुकान क्र.१७ ही श्री.भाऊसाहेब रायभान काळे (नव्याने भरलेली निविदाधारक) यांचेऐवजी पुर्वीचे भाडेकरु श्री.मो. फकरोद्दीन मो. इसाकोद्दीन यांचे नावाने कायम ठेवल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात रक्कम रू.७८,९२९/- ची वाढ होईल करीता सदरील दुकान क्र.१७ ही श्री. भाऊसाहेब रायभान काळे यांचेऐवजी श्री.मो. फकरोद्दीन मो. इसाकोद्दीने यांचे नावाने मंजुर करणे योग्य राहील.

तसेच उर्वरीत दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी.

प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :बऱ्याच वर्षापासुन गाळे रिक्त आहे सदरील गाळे रिक्त असण्याचे कारण काय आहे. यावर कुणाची तरी जबाबदारी फिक्स करण्यात यावी. मालमत्तेचे मोठे नुकसान संबधीतांनी केलेले आहे. जाणीवपुर्वक केलेले आहे. टेंडर एवढे दिवस का काढण्यात आले नाही याबाबतीत चौकशी समिती नेमण्यात यावी जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत आहे. संबधीत गाळे परस्पर देण्यात येतात अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष देत नाही. जबाबदारी निश्चित करावी.

श्री.विजय वाघचौरे :हर्सुल तलाव येथील डबकी माशेचे टेंडर मागील 2 वर्षापुर्वी झाले असुन आजपर्यंत किती वसुली संबधीत कंत्राटदाराकडुन झाली आहे. आत्तापर्यंत संबधीत कंत्राटदाराकडे 14 ते 15 लाख रूपये थकीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मालमत्ता विभागातील काही कर्मचाऱ्यांनी एखादे टेंडर काढुन मॅनेज करायचे रिंग करायचे. सदरील टेंडर हे चार ते पाच वर्ष सतत चालवायचे रिटेंडर काढण्यात येत नाही. वाढ जरी झाली तरी वसुली होत नाही. वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी विचारणा केली असता चेक घेतला जातो तो बाऊन्स होतो व त्यावर काहीही कार्यवाही होत नाही. सदरील व्यक्ती चार चार वर्ष उत्पन्न प्राप्त करतो.

श्री.विजय वाघचौरे :12ते 14 लाख रूपये थकीत आहे संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा. रिटेंडर झाले होते किंवा नाही.

मालमत्ता अधिकारी :जो विषय उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात माहिती मागवुन खुलासा सादर करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व तलावांचे टेंडर काढण्यात यावे.

मा.सभापती :महानगरपालिकेने करोडो रूपये खर्च करून शॉपिंग कॉम्पलेक्स, तलाव दुरूस्त केलेत बांधलेत किंवा त्यावर खर्च करीत आहे. यातुन उत्पन्नाचे मोठे साधन मिळणार आहे. परंतु मनपाचे अधिकारी जाणुन बुजून त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. संबधीत अधिकारी यांनी अशा प्रकारची सिस्टीम तयार केलेली आहे की, आपल्याच मर्जीतील व्यक्तीला टेंडर द्यायचे त्यानंतर त्यांच्याकडुन वसुली सुध्दा करायची नाही. ज्या ज्या कंत्राटदाराकडे बाकी असेल त्यांच्याकडुन सक्तीने वसुली करण्यात यावी. संबधीत अधिकारी त्यांना सुचना देण्यात यावी. ज्या ज्या टेंडरची डेट संपलेली असेल ते रिकॉल करण्यात यावी व जे पैसे भरत नसेल त्यांचेही रिकॉल करण्यात यावे आणि हे दुकाना अद्यापपर्यंत भाडयाने का देण्यात आल्या नाही. त्यामुळे आपले मालमत्तेचे आर्थीक नुकसान झालेले आहे. संबधीत जो कुणी अधिकारी असेल ज्या वार्डात येत असेल त्या अधिकारी यांचेवरही कार्यवाही करावी. कोणतेही दुकान तीन वर्षांच्या वर भाडयाने देण्यात येवु नये. तसेच ज्या निवीदा मागविण्यात आल्या होत्या त्यात तफावत का आहे. 360 अपेक्षित

रक्कम असतांना 2100 प्रतिमहीना भाडे आलेले आहे. ज्या ठिकाणी अपेक्षित रक्कम 720 आहे त्या ठिकाणी जास्त दर आलेले आहे. ज्या ठिकाणी 421 अपेक्षित असतांना 2100 रूपये भाडे येत आहे. ज्या ठिकाणी 400 रूपये भाडे अपेक्षित असतांना 2600 रूपये भाडे येत आहे. खुलासा करण्यात यावा. कशाच्या आधारे हि रक्कम ठरविण्यात आलेली आहे.

शहर अभियंता :प्रति चौ.मी. जे दर काढण्यात आलेले आहे ते रेडी रेकरनचा दर घेऊन त्या भागाचा त्यानुसार हा रेट काढण्यात येतो. अपेक्षित रक्कमेपेक्षा जास्त दर आपणांस अपेक्षित असतो.

श्री.रेणुकादास वैद्य :सरासरी 10 टक्के वाढ करून किंवा जे जास्त आहे ते नमूद करावे.

मा.सभापती :उदा. महसुल विभागाचा एखाद्या ठिकाणची रजिष्ट्री करतो एखाद्या ठिकाणचा भाव तीन लाख रूपये असेल व एखाद्याचे रजिष्ट्री दहा लाखाची केल्यास पुढच्या वेळेस दहा लाख दर धरण्यात येतो. यानंतर जे काही दर लावण्यात येतो त्याचे 2100 रूपये भाडे येते तर पुढे 10 टक्के लावण्यात यावे.

शहर अभियंता :तीन वर्षासाठी सदरील दर राहतील त्यानंतर जेव्हा निवीदा काढु व हे ठेवू.

श्री.रेणुकादास वैद्य :जी Average वाढ असेल तीच्यावर 10 टक्के वाढ करून पुढच्या वेळेस करण्यात यावी.

मा.सभापती :जी सर्वात जास्त असेल त्यांना देण्यात यावे. जे जास्तीचे दर आलेले आहे त्यांना देण्यात यावे.

पान क्रमांक 5 दुकान क्रमांक 17 बाबत खुलासा करण्यात यावा. पुर्वीच्या दुकानदारानेही मागणी केलेली आहे खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :दुकान नंबर 17 मध्ये श्री.फक्रोद्दीन इसाकोद्दीन यांना जाहिर लिलावाद्वारे 2010 मध्ये निवीदा काढली होती. 14400 रूपये आगाऊ भाडे 7332 रूपये भाडे असे एकुण 36,132 रूपये भरणा केला होता परंतु त्याने करारनामा करून दिला नव्हता म्हणुन दुकान ताब्यात घेतली आहे. त्याच्या नंतर फेर निवीदा काढल्या आहे. फेर निवीदा काढली असता श्री.भाऊसाहेब काळे यांनी 2001 रूपये प्रतिमहा असा सर्वोच्च दर दिलेला आहे. सर्व दर वसुल केल्यास रूपये 48,511/- वसुल होतात श्री.फक्रोद्दीन इसाकोद्दीन यांची निवीदा रद्द केली होती त्यांनी हयाच दराने पैसे भरुन घेण्याची विनंती केली आहे. त्याचे म्हणने ऐकले तर 1,27,444 रूपये मनपाला मिळु शकतात.

मा.सभापती :अशे दोन विषय आहेत. (पिया मार्केट)

एक महिण्याची मुदत देण्यात यावी. 1,27,444/- भरून दिले तर दुकान त्यांना देण्यात यावी नसता नविन निवीदा ज्यांनी भरलेली आहे त्यांना देण्यात यावे. विषय दुरूस्तीसह मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या पिया मार्केट पहिला मजला येथील व्यापारी संकुलातील दुकाने दु.क्र.27, 29, 30 व 31 भाडे तत्वावर देण्यासाठी प्राप्त झालेल्या अति उच्च निविदा धारकाचे नांवाने त्यांच्या नांवासमोर निविदेत दर्शविलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.5/- प्रमाणे,

अकृषीक कर रू.7.68 प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाड्याच्या बारापट प्रमाणे आकारून तीन वर्षाकरीता सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दुकान क्रं.17 ही यापूर्वी श्री.मो.फकरोद्दीन मो.इसाकोद्दीन यांना जाहिर लिलावाद्वारे भाडे तत्वावर दिल्याप्रमाणे व त्यांच्या कडून यापूर्वीच्या असलेल्या थकबाकीसह त्यांना एक महिण्याची मुदत देण्यात येवून त्यांनी जर र.रू.1,27,444/- चा भरणा मनपास केला तर त्यांना सदरील देण्यांत यावी. नसता नविन निवीदा ज्यांनी भरलेली आहे त्यांना एक महिना मुदतीनंतर ही दुकान देण्यात यावी. या दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 24 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **नूपूर अपार्टमेंट शेजारील** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**नुपूर अपार्टमेंट शेजारील व्यापारी संकुल** मधील एकुण ०५ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता सर्व दुकानासाठी दु.क.१,२,३,४ व ५साठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र.०१ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री. सुनिल एस. थिटे** | **रू.७२०/-** | **रू.११००/-** | --- |
| ०२ | श्री.नुसीर नाईकवाडे | रू.७२०/- | रू.२००३/- | --- |
| ०३. | श्री.विनायक ढोकरट | रू.७२०/- | रू.२१७१/- | --- |
| ०४. | श्री.राहूल खामगांवकर | रू.७२०/- | ---- | अप्राप्त |

**०२. दुकान क्र.०२ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. सुनिल एस. थिटे | रू.७२०/- | रू.१२५१/- | --- |
| **०२.** | **श्री. पुंडलिक देशमुख** | **रू.७२०/-** | **रू.१७११/-** | --- |
| ०३. | श्री. सुनिल संपतराव बोराडे | रू.७२०/- | --- | अप्राप्त |
| ०४. | श्री. राहूल खामगांवकर | रू.७२०/- | --- | अप्राप्त |

**०३. दुकान क्र.०३ (खुल्या वर्गासाठी)**

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **अपेक्षित रक्कम** | **प्राप्त रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. पुरुषोत्तम जोशी | रू.७२०/- | रू.८००/- | -- |
| **०२.** | **श्री. सुनिल एस. थिटे** | **रू.७२०/-** | **रू.१२५१/-** | -- |
| ०३. | श्री. विवेक शिवाजीराव तौर | रू.७२०/- | --- | अप्राप्त |

**०४. दुकान क्र.०४ (सुशिक्षीत बेरोजगार / अंध / अपंग)**

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **अपेक्षित रक्कम** | **प्राप्त रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. नुसीर नाईकवाडे | रू.३८४/- | --- | नि.उ.ना. |
| **०२.** | **श्री. अर्जुन क्षीरसागर** | **रू.३८४/-** | **रू.१००१/-** | -- |
| ०३. | श्रीमती जयश्री गायकवाड | रू.३८४/- | --- | नि.उ.ना. |
| ०४. | श्री. सतिष ग्यानदेव बनसोडे | रू.३८४/- | --- | नि.उ.ना. |

**०५. दुकान क्र.०५. (खुल्या वर्गासाठी)**

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **अपेक्षित रक्कम** | **प्राप्त रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **श्री. सुनिल एस. थिटे** | **रू.७२०/-** | **रू.१२११/-** | -- |
| ०२. | श्रीमती पद्मावती एन. मेहेर | रू.७२०/- | रू.९९९/- | -- |
| ०३. | श्री. वसंत फकीरराव गाडे | रू.७२०/- | रू.८००/- | -- |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.विजय वाघचौरे :जय टॉवर दुकानाचे किती टेंडर आलेले आहे. किती लोकांनी पैसे भरलेले आहे. दुकान नंबर 31 चे टेंडरच काढलेले नाही.

मा.सभापती :नुपूर अपार्टमेंटची माहिती देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :अदिनाथ नगरच्या समोरच्या बाजुला 50 फुट डिपी रोड जो आहे हि इमारत आपल्याला अकोमोडेशन रिर्झवेशनमध्ये मिळालेली आहे. साधारणत: 5 दुकाने रिक्त आहेत त्यासाठी निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत.

मा.सभापती :विषय मंजूर करण्यात येतो. यानंतर ज्या ज्या मनपाच्या दुकाना असतील किंवा ज्या मालमत्तांपासुन उत्पन्न मिळणार आहे त्याचा सर्वे करण्यात यावा आणि जे दुकाना राहिले असेल त्यांचे टेंडर पुन्हा काढण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या नुपूर अपार्टमेंट शेजारील व्यापारी संकुलातील दु.क्र.1 ते 5 दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी प्राप्त झालेल्या अति उच्च निविदा धारकाचे नांवाने त्यांच्या नांवासमोर निविदेत दर्शविलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.5/- प्रमाणे, अकृषीक कर रू.7.68 प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाड्याच्या बारापट प्रमाणे आकारून तीन वर्षाकरीता सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 25 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **जय टॉवर शेजारील** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**जय टॉवर शेजारील व्यापारी संकुल** मधील एकुण ०२ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता सर्व दुकानासाठी दु.क.१ व २ साठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र.०१ (मागासवर्गीयासाठी राखीव)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. गणेश काळुसिंग मेहरा | रू.११४७/- | रू.१६००/- | --- |
| **०२** | **श्री.विनोद जयसिंग राठोड** | **रू.११४७/-** | **रू.२००५/-** | --- |
| ०३. | श्री.शैलेश किशोर जिवने | रू.११४७/- | ---- | अप्राप्त |

**०२. दुकान क्र.०२ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री. विजय उत्तमराव जाखडे** | **रू.११४७/-** | **रू.१२००/-** | --- |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.विजय वाघचौरे | :जय टॉवर येथील दुकान नंबर 21 बाबत खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| मालमत्ता अधिकारी | :दुकान नंबर 21 बाबत निवीदा मागविण्यात आली होती. हि दुकान श्री.विजय देवराव तांबे यांना मिळालेली होती. तयांनी 2610 प्रमाणे रेट भरला होता. त्याप्रमाणे त्यांना दि.21.10.2009, दि.17.12.2009, दि.27.1.2010 आणि दि.10.02.2010 रोजी चौथी नोटीस दिली अशी चार वेळेस पैसे भरणासाठी नोटीस दिलेली आहे. त्यांचे रूपये 5000 जप्त केले आणि दुकाने रद्द केली आहे. त्यानंतर स्थायी समिती बैठक दिनांक 15.02.2010 रोजी ठराव क्रमांक 403 श्री.सुधाकर शंकरराव बागुल, रा.पडेगांव यांचे नावांने ठराव मंजूर झाला आणि प्रति चौ.मि 100 रूपये दराने हि जागा दिली. म्हणजे 1373 रूपये प्रति महिना दिली. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :2600 रूपये प्रति महिन्याची दुकान 1373 रूपये दराने दिली जाते. |
| श्री.विजय वाघचौरे | :रिटेंडर का करण्यात आले नाही. |
| मालमत्ता अधिकारी | :संचिका हि मान्यतेसाठी आहे. |
| मा.सभापती | : रिटेंडर करण्यात यावे 2600 रूपये दराच्या पुढे आले तर देण्यात यावे. पुर्वीपेक्षा कमी आलेले आहे ते रिटेंडर करण्यात यावे. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या जय टॉवर शेजारील व्यापारी संकुलातील दु.क्र.1 व 2 दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी प्राप्त झालेल्या अति उच्च निविदा धारकाचे नांवाने त्यांच्या नांवासमोर निविदेत दर्शविलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.5/- प्रमाणे, अकृषीक कर रू.7.68 प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाड्याच्या बारापट प्रमाणे आकारून तीन वर्षाकरीता सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दु.क्रं.21 च्या संदर्भात रिटेंडर करण्यांत येवून रू.2600/- या दरापेक्षा जास्त दराने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 26 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **सादिया टॉकीज मागील** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुल** मधील एकुण ०२ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता सर्व दुकानासाठी दु.क्र.एस-१० व एस-१६ साठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र. एस १० (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री. ज्ञानेश्वर शिंदे** | **रू.१७३/-** | **रू.५५०/-** | --- |
| ०२ | श्री.आमेर अन्सारी | रू.१७३/- | रू.४७७/- | --- |

**०२. दुकान क्र. एस १६ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री. ज्ञानेश्वर शिंदे** | **रू.२१२/-** | **रू.८००/-** | --- |
| ०२ | श्री.आमेर अन्सारी | रू.२१२/- | रू.३७७/- | --- |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.विकास जैन :5800 भरलेले आहे. ते चालवू शकत नाही. अपंग आहेत. श्री.द्वारकादास अनंतराव देशपांडे.

श्री.रेणुकादास वैद्य :पैठणगेट येथे अंडरग्राऊंड शाळेला परवानगी दिलेली आहे. हे धोकादायक बाब आहे. दुकान केंद्रात लहान मुलांची शाळा असु नये, 81(ब) नुसार तरतुद आहे त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :अंडरग्राऊंडमध्ये शाळा असतील तर तात्काळ बंद करण्यात यावे.
जे वाढून आलेले आहे ते दर मान्य नसता निविदा मागवावी.
पुर्वी मनपाला वाढुन आलेले दर त्या दराने देत असेल तर त्यांना Continue करण्यात यावे नसता निवीदा मागविण्यात यावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दु.क्र.एस-10 व एस-16 दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी प्राप्त झालेल्या अति उच्च निविदा धारकाचे नांवाने त्यांच्या नांवासमोर निविदेत दर्शविलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.5/- प्रमाणे, अकृषीक कर रू.7.68 प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाड्याच्या बारापट प्रमाणे आकारून तीन वर्षाकरीता सदरील दुकाने भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पैठणगेट येथे अंडरग्राऊंडमध्ये शाळा असतील तर तात्काळ बंद करण्यात यावे. व जे वाढवून आलेले आहे ते दर मान्य करावे, नसता निविदा मागवावी. तसेच यापुर्वी मनपाला वाढवून आलेले दर आहे, त्या दराने देत असेल तर त्यांना Continue करण्यात यावे नसता निवीदा मागविण्यात यावे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 27 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **संत गाडगेबाबा** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**संत गाडगेबाबा व्यापारी संकुल** मधील एकुण ०२ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र. २१ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री. संतोष प्रकाश तांबे** | **रू.९००/-** | **रू.२१०१/-** | --- |
| ०२ | श्री.जी. व्ही. पगारे | रू.९००/- | रू.१५२५/- | --- |
| ०३. | श्री. उमेश बडोदे | रू.९००/- | रू.१९१०/- | -- |
| ०४. | श्री. रुपसिंग चिरामीया | रू.९००/- | रू.२१००/- | -- |
| ०५. | श्री. निलेश गव्हाळ | रू.९००/- | रू.७८८/- | -- |
| ०६. | श्री. राहूल कंधारकर | रू.९००/- | --- | अप्राप्त |

**०२. दुकान क्र. २४ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१** | **श्री. संतोष प्रकाश तांबे** | **रू.९००/-** | **रू.२२११/-** | --- |
| ०२ | श्री.सलीम उल्ला अता उल्ला | रू.९००/- | रू.२०००/- | --- |
| ०३. | श्री. विशाल चव्हाण | रू.९००/- | रू.११५६/- | --- |

परंतु दुकान क्र. २४ ही यापूर्वी श्री. सी. के. पंढरे यांना जाहिर लिलावाद्वारे भाडेतत्वावर देण्यात आलेली होती त्यापोटी संबंधीताने अनामत रक्कम रू.४७,०००/- अधिक रू.५,०००/- असे एकुण रू.५२,०००/- आणि एक वर्षाचे आगाऊ भाडे रक्कम रू. ७,०२०/- असे एकुण रू.५९,०२०/- या कार्यालयात भरणा केलेला होता. परंतु संबंधीताने करारनामा करुन न दिल्यामुळे सदरील दुकान ताब्यात घेऊन फेरलिलाव करण्यात आला असता त्यांची पत्नी श्रीमती लक्ष्मीबाई चं. पंढरे यांनी अर्ज देऊन विनंती केली आहे की, मध्यंतरीच्या काळात (सन २००७ मध्ये) त्यांचे पतीचे निधन झाल्याने आणि इतर वैयक्तिक अडचणीमुळे सदरील दुकानाचा करारनामा करुन देण्यास अडचण निर्माण झाली होती. तसेच अर्जासोबत मृत्यु प्रमाणपत्र आणि वारस प्रमाणपत्र सादर करुन सन २००३ ते २०१० पर्यंतची थकबाकीसह नव्याने प्राप्त झालेल्या निविदेतील सर्वोत्तम रक्कम रू. २२११/- या दराप्रमाणे सदरील दुकान भाडेतत्वावर घेण्यास संमती दर्शवलेली आहे. तथापी सदर

दुकान क्र.२४ ही श्रीमती लक्ष्मीबाई चंद्रकांत पंढरे यांना भाडेतत्वावर दिल्यास महानगरपालिकेस यापूर्वी रक्कम रू.५९,०२०/- प्राप्त झालेले असून थकबाकीपोटी प्राप्त होणारी रक्कम रू.४९,१४०/- आणि वाढीव दराने एक वर्षाचे आगाऊ भाडे रक्कम रू.२६,५३२/- सेवाशुल्क रू.५४०/- अकृषीक कर रू.७०/- असे एकुण रू.१,३५,३०२/- चा महानगरपालिकेचे उत्पन्न वाढू शकेल.

करीता सदरील व्यापारी संकुलातील दुकान क्र.२४ ही श्री.संतोष प्रकाश तांबे यांची निविदेतील नमूद रक्कम रू.२२११/- सर्वोच्च असल्याने त्यांचेकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे पोटी रू.२६,५३२/- सेवाशुल्क रू.५४०/- अकृषीक कर रू.७०/- आणि मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे रक्कम रू.२६५३२/- असे एकुण रक्कम रू.५३,६७४/- चे महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल तेंव्हा महानगरपालिकेच्या उत्पन्नात रक्कम रू.८१,६२८/- ची वाढ होईल करीता सदरील दुकान क्र.२४ ही श्री.संतोष प्रकाश तांबे यांचेऐवजी श्रीमती लक्ष्मीबाई चंद्रकांत पंढरे यांचे नावाने मंजुर करणे योग्य राहील.

तसेच उर्वरीत दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रं. 27, 28, 29, 30 व 31 सर्व मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीच्या संत गाडगेबाबा व्यापारी संकुलामधील दु.क्रं.21 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.संतोष प्रकाश तांबे यांना निविदा धारकांचे नांवासमोर निविदेत नमुद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क,अकृषिक कर, आणि अनामत रक्कम आकारणी करून 03 वर्ष मुदतीसाठी भाडे तत्वावर देण्यास तसेच दु.क्र.24 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च दराप्रमाणे महानगरपालिकेचे उत्पन्नात रक्कम रू.81,628/- ची वाढ होत असल्याचे प्रस्तावात नमुद केल्यानुसार दु.क्र.24 ही श्री.संतोष प्रकाश तांबे यांच्या ऐवजी श्रीमती लक्ष्मीबाई चंद्रकांत पंढरे यांना एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क,अकृषिक कर, आणि अनामत रक्कम आकारणी करून 03 वर्ष मुदतीसाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 28 :</u>**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **भोलेश्वर** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**<u>भोलेश्वर व्यापारी संकुल</u>** मधील एकुण ०५ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता दु.क्र.०१ व २३ वगळता उर्वरीत दु.क्र.५,९ आणि १२ या दुकानासाठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र. ०५ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. रमेश योगीराज जंगम | रू.१२७२/- | --- | अप्राप्त |
| **०२.** | **श्री. पंकज जैस्वाल** | **रू.१२७२/-** | **रू.२०००/-** | --- |
| ०३. | श्री. जी. व्ही. पगारे | रू.१२७२/- | रू.१६७२/- | -- |

**०२. दुकान क्र. ०९ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ. जयश्री रमेश जंगम | रू.१२७२/- | --- | अप्राप्त |
| ०२. | श्री. भागवत सखाराम बागल | रू.१२७२/- | रू.१३२५/- | -- |
| **०३.** | **श्री. जी. व्ही. पगारे** | **रू.१२७२/-** | **रू.१७७५/-** | -- |

**०३. दुकान क्र. १२ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. विनोद वि. कुंटे | रू.१४४९/- | रू.२३५१/- | -- |
| ०२. | श्री. रमेश वैजीनाथ कुंटे | रू.१४४९/- | रू.२५११/- | -- |
| ०३. | श्री. शाम भगवानराव सातपुते | रू.१४४९/- | रू.१९५१/- | -- |
| ०४. | श्री. सोमनाथ गंगाधर बोंबले | रू.१४४९/- | रू.२१५१/- | -- |
| ०५. | श्री. सचिन नंदकिशोर अक्कर | रू.१४४९/- | रू.२०००/- | --- |
| ०६. | श्री. मधू दर्डा | रू.१४४९/- | रू.२१०१/- | -- |
| ०७. | सौ. उषा सतिष काजळे | रू.१४४९/- | रू.१९००/- | -- |
| ०८. | सौ. सविता उमेश वाघले | रू.१४४९/- | --- | अप्राप्त |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एकवर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी.प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील. करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीच्या भोलेश्वर व्यापारी संकुलामधील दु.क्रं.05 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.पंकज जैस्वाल, दु.क्रं.09 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.जी.व्ही.पगारे व दु.क्रं.12 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.रमेश वैजीनाथ कुंटे यांना निविदा धारकांचे नांवासमोर निविदेत नमुद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे

एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क,अकृषिक कर, आणि अनामत रक्कम आकारणी करून 03 वर्ष मुदतीसाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 29 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **संजयनगर** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**संजयनगर येथील व्यापारी संकुल** मधील एकुण ०१ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ०३ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र. ०५ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. सय्यद शौकत अली | रू.३१५/- | रू.३२०/- | -- |
| ०२. | श्री.सुधाकर कल्याणराव वायबसे | रू.३१५/- | रू.७००/- | -- |
| **०३.** | **श्री. जी. व्ही. पगारे** | **रू.३१५/-** | **रू.८७५/-** | -- |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीच्या संजयनगर येथील व्यापारी संकुलामधील दु.क्रं.05 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.जी.व्ही.पगारे यांना निविदा धारकांचे नांवासमोर निविदेत नमुद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क, अकृषिक कर, आणि अनामत रक्कम आकारणी करून 03 वर्ष मुदतीसाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 30 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **चिकलठाणा** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या

ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**चिकलठाणा येथील व्यापारी संकुल** मधील एकुण ०१ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र. ०७ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. जी. व्ही. पगारे | रू.१३७५/- | रू.३१२५/- | -- |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीच्या चिकलठाणा येथील व्यापारी संकुलामधील दु.क्रं.07 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.जी.व्ही.पगारे यांना निविदा धारकांचे नांवासमोर निविदेत नमुद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क, अकृषिक कर, आणि अनामत रक्कम आकारणी करून 03 वर्ष मुदतीसाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 31 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **शहागंज** व्यापारी संकुलातील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही गाळे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**शहागंज येथील व्यापारी संकुल** मधील एकुण ०३ दुकानांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता दु.क्र.७४ वगळता उर्वरीत दु.क्र.५४ व ९६ यादुकानासाठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. दुकान क्र. ५४ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.रोशन वैजीनाथ कुंटे | रू.८००/- | रू.२०२१/- | -- |
| ०२. | श्री. कृष्णराव यमूल | रू.८००/- | रू.१७००/- | -- |

**०२. दुकान क्र. ९६ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.विनायक बन्शीलाल ढोकरट | रू.८००/- | रू.१८७१/- | -- |
| ०२. | श्री.शकील चौधरी हुसेन | रू.८००/- | रू.८२०/- | -- |
| ०३. | श्री. हसवी मो. मुदसीर | रू.८००/- | रू.१३५१/- | -- |

तसेच सदरील दुकाने अतिउच्च निविदाधारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी.प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार दुकाने तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीच्या शहागंज येथील व्यापारी संकुलामधील दु.क्रं.54 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.रोशन वैजीनाथ कुंटे व दु.क्रं.96 साठी प्राप्त झालेल्या अतिउच्च निविदा धारक श्री.विनायक बन्शीलाल ढोकरट यांना निविदा धारकांचे नांवासमोर निविदेत नमुद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क,अकृषिक कर, आणि अनामत रक्कम आकारणी करून 03 वर्ष मुदतीसाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 32 :**

मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका ओरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या **शहानूरवाडी येथील भाजी मार्केट** येथील बऱ्याच वर्षापासुन / बांधल्यापासुन आणि अनेक वेळा जाहीर लिलाव / निविदा प्रसिध्द करुन देखील काही ओटे रिक्तच असल्याने मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.२७६ दि.२९-१२-२००९ आणि ठराव क्र.४०३ दि.१५-०२-२०१० अन्वये संदर्भीय दुकानाचे काही प्रमाणात दर कमी करुन कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/८७४/२०१० दि.०३-०५-२०१० अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१२-०५-२०१० पर्यंत देण्यात आली असता अंतिम मुदतीच्या आत प्राप्त निविदा दि.१३-०५-२०१० रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**शहानुरवाडी येथील भाजी मार्केट** मधील एकुण ४० ओटयांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता ओटा क्र.१७,१९,२०,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३२,३३,३५ व ३८ वगळता उर्वरीत २६ ओटयासाठी प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. ओटा क्र. ०१ (मागासवर्गीयासाठी राखीव)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **श्रीम.शुक्रीया विजय जाधव** | **रू.४२६/-** | **रू.१५५१/-** | -- |
| ०२. | श्री. वसंत फकीरराव गाडे | रू.४२६/- | --- | नि.उ.ना. |
| ०३. | सौ. शशीकला खोबरे | रू.४२६/- | --- | नि.उ.ना. |
| ०४. | श्री. राजू लक्ष्मण जाटवे | रू.४२६/- | रू.१००१/- | -- |
| ०५. | श्री. रमेश बी थोरात | रू.४२६/- | रू.५०६/- | -- |
| ०६. | श्री. निलेश गव्हाळ | रू.४२६/- | रू.१२४०/- | -- |

**०२. ओटा क्र. ०२ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. वसंत फकीरराव गाडे | रू.४२६/- | रू.६००/- | -- |
| ०२. | श्री. अनंता आसाराम इंगळे | रू.४२६/- | रू.१२०१/- | -- |
| **०३.** | **श्री. अरूण बळवंत वाघ** | **रू.४२६/-** | **रू.१५००/-** | -- |
| ०४. | श्री. अमोल गजानन खाडे | रू.४२६/- | --- | अप्राप्त |

**०३. ओटा क्र. ०३ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.सचिन सुभाष टेटवार | रू.४२६/- | रू.८००/- | -- |
| ०२. | श्री. अमोल गजानन खाडे | रू.४२६/- | --- | अप्राप्त |
| **०३.** | **श्रीमती संगीता अरूण वाघ** | **रू.४२६/-** | **रू.१५००/-** | -- |

**०४. ओटा क्र. ०४ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | **श्री. सचिन सुभाष टेटवार** | रू.४२६/- | रू.५५१/- | -- |

**०५. ओटा क्र. ०५ (सुशिक्षीत बेरोजगार/अंध/अपंग साठी राखीव)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीम. शाहिस्तानी महेबुब | रू.४२६/- | --- | नि.उ.ना. |
| ०२. | श्री. आनवर मुसा शेख | रू.४२६/- | रू.६००/- | -- |

०६. ओटा क्र. ०६ (खुल्या वर्गासाठी )

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. रावसाहेब सखाराम ससाणे | रू.४२६/- | --- | अप्राप्त |
| ०२. | श्रीमती. शिलादेवी कांतीलाल अग्रवाल | रू.४२६/- | रू.२१००/- | -- |

०७. ओटा क्र. ०७ (खुल्या वर्गासाठी )

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ. राधाबाई तेजराव शिंदे | रू.४२६/- | रू.१०००/- | -- |
| ०२. | श्री. जितेंद्र श्रीकिसन टेटवार | रू.४२६/- | रू.७३०/- | -- |

०८. ओटा क्र. ०८ (खुल्या वर्गासाठी )

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. राहूल शंकरलाल टेटवार | रू.४२६/- | रू.५५१/- | -- |

०९. ओटा क्र. ०९ (खुल्या वर्गासाठी )

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. विरेंद्र शंकरलाल टेटवार | रू.४२६/- | रू.७८०/- | -- |
| ०२. | श्री. राजू कोलते | रू.४२६/- | रू.६०२/- | -- |

१०. ओटा क्र. १० (खुल्या वर्गासाठी )

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. रामदास कोळेकर | रू.४२६/- | --- | अप्राप्त |
| ०२. | श्री. सोमनाथ ग. बोंबले | रू.४२६/- | रू.१५५१/- | -- |
| ०३. | श्री. सचिन सुभाष टेटवार | रू.४२६/- | रू.१४४१/- | -- |
| ०४. | सौ. शशिकला खोबरे | रू.४२६/- | ---- | नि.उ.ना. |
| ०५. | श्री. रमेश बी. थोरात | रू.४२६/- | रू.४८८/- | -- |
| ०६. | श्री. अजमत आजम खान | रू.४२६/- | रू.५५५/- | -- |

११. ओटा क्र. ११ (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. रामदास कोळेकर | रू.४२६/- | --- | अप्राप्त |
| ०२. | श्री. राजेभाऊ रामकिसन मोगल | रू.४२६/- | रू.५५१/- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | श्री. आतिश भगवानराव जोजारे | रू.४२६/- | रू.१२३१/- | -- |
| ०४. | श्री. देशकर जालींदर एकनाथ | रू.४२६/- | --- | अप्राप्त |

**१२. ओटा क्र. १२ (खुल्या वर्गासाठी )**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. शेख उमर शेख नवाब | रू.४२६/- | रू.७१०/- | -- |
| ०२. | श्री. मंगेश गणेश कुंढारे | रू.४२६/- | रू.६०५/- | -- |

**१३. ओटा क्र. १३ (खुल्या वर्गासाठी )**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती. गायत्री शंकरराव यादव | रू.४२६/- | रू.५००/- | -- |

**१४. ओटा क्र. १४ (खुल्या वर्गासाठी )**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. इरफान खान इब्राहीम खान | रू.४२६/- | रू.५००/- | -- |

**१५. ओटा क्र. १५ (खुल्या वर्गासाठी )**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. इमरान खान इब्राहीम खान | रू.४२६/- | रू.८५०/- | -- |
| ०२. | श्रीमती.शिलादेवी कांतीलाल अग्रवाल | रू.४२६/- | रू.२२००/- | -- |

**१६. ओटा क्र. १६ (खुल्या वर्गासाठी )**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ.निर्मलाबाई मनोहर बनकर | रू.४२६/- | रू.११००/- | -- |
| ०२. | श्रीमती.शिलादेवी कांतीलाल अग्रवाल | रू.४२६/- | रू.२३००/- | -- |

**१७. ओटा क्र. १८ (खुल्या वर्गासाठी)**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. दत्ता आसाराम इंगळे | रू.४२६/- | रू.५०१/- | -- |

१८. ओटा क्र. २१ (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ. लक्ष्मीबाई संजय वाघ | रू.४२६/- | रू.१५००/- | -- |
| ०२. | श्री. दिनेश गुप्ता | रू.४२६/- | रू.५५०/- | -- |

१९. ओटा क्र. २४ (सुशिक्षीत बेरोजगार / अंध/ अपंग साठी राखीव)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ. इब्राहीम मुसा शेख | रू.४२६/- | रू.४३०/- | -- |

२०. ओटा क्र. ३० (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. संजय बळवंत वाघ | रू.४२६/- | रू.१५००/- | -- |

२१. ओटा क्र. ३१ (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ. शशिकला खोबरे | रू.४२६/- | --- | नि.उ.ना. |
| ०२. | शामकुमार सुरजलाल जायस्वाल | रू.४२६/- | रू.५१०/- | -- |

२२. ओटा क्र. ३४ (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती. सुमन कचरु वाहुळ | रू.४२६/- | रू.७००/- | -- |

२३. ओटा क्र. ३६ (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. अमोल गजानन खाडे | रू.४२६/- | रू.४२७/- | -- |

२४. ओटा क्र. ३७ (खुल्या वर्गासाठी)

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. अमोल गजानन खाडे | रू.४२६/- | रू.४२८/- | -- |

---

२५. ओटा क्र. ३९ (खुल्या वर्गासाठी)

---

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. रिझवान खान इब्राहीम खान | रू.४२६/- | रू.१११०/- | -- |
| ०२. | श्री. शेख शरीफ शेख इसाक | रू.४२६/- | रू.५००/- | -- |

---

२६. ओटा क्र. ४० (खुल्या वर्गासाठी)

---

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ. शशिकला खोबरे | रू.४२६/- | --- | नि.उ.ना. |
| ०२. | श्री. दिलीप लहानुजी झगडे | रू.४२६/- | रू.१०२१/- | -- |
| ०३. | श्री. शामकुमार सुरजलाल जायस्वाल | रू.४२६/- | रू.६१०/- | -- |
| ०४. | श्री. शेख शकील शे. रशीद | रू.४२६/- | रू.५००/- | -- |

---

याप्रमाणे तपशिल असून ओटा क्र.०४,०५,०८,१३,१४,१८,२४,३१,३४,३६ व ३७ साठी प्रत्येकी एकच निविदा प्राप्त झाली असून स्पर्धात्मक दर नसल्याने या ओटयांचे आणि एकही निविदा प्राप्त न झालेले ओटा क्र. १७,१९,२०,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३२,३३,३५ व ३८ असे एकुण २५ ओटयासाठी फेरनिविदा मागविणे योग्य.

तसेच उर्वरीत ओटे अतिउच्च निविदा धारकाचे नावाने मंजुर करणे असल्यास त्यांचे नावासमोर निविदेत नमूद केलेल्या मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार ओटे तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.सुर्यकांत जायभाये : शहानुरवाडी दर्गाह ते पीर बाजार या रस्त्यात ज्यांचे दुकान गेले, त्यांना महानगरपालिकेचे दुकान देता येत असेल तर देण्यात यावे.

मा.सभापती : सर्वात जास्त दराने.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मनपाच्या मालकीच्या शहानुरवाडी येथील भाजी मार्केट मधील एकूण 40 ओटे भाडेने देणेसाठी मागविण्यांत आलेल्या निविदानुसार ओटा क्र.०४,०५,०८,१३,१४,१८,२४,३१,३४,३६ व ३७ साठी प्रत्येकी एकच निविदा प्राप्त झाली असून स्पर्धात्मक दर नसल्याने या ओटयांचे आणि एकही निविदा प्राप्त न झालेले ओटा क्र. १७,१९,२०,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३२,३३,३५ व ३८ असे एकुण २५ ओटयासाठी फेरनिविदा मागविणेस मान्यता देण्यांत येते.

तसेच उर्वरीत ओटे अतिउच्च निविदा धारकाने त्यांचे नांवासमोर निविदेत नमुद केल्यानुसार मासिक भाडेप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे, व निविदा अटी शर्तीप्रमाणे सेवाशुल्क प्रति चौ.मी. प्रतिमाह रू.५/- प्रमाणे, अकृषीक कर रू.७.६८ प्रति चौ.मी. प्रतिवर्ष प्रमाणे आणि

अनामत रक्कम मासिक भाडयाच्या बारापट प्रमाणे आकारून सदरील ओटे तीन (०३) वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 33 :**

सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, पैठणगेट ते सिल्लेखाना 30.00 मीटर रूंद विकास योजना रस्ता महानगरपालिकेतर्फे विकसीत करण्यात येत असून नगर भूमापन क्रमांक 14139/ पैकी ही मिळकत सौ.शोभा भ्र. विजयसिंह राजपुत यांची असून विकास योजना रस्त्यात 62.25 चौ.मी. क्षेत्र बाधीत होत आहे. सदर क्षेत्र भूखंडधारक हे खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेस देण्यास तयार आहेत.

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सदर रस्त्यात बाधीत मिळकती ताब्यात घेणे बद्दल निर्णय घेतला होता. मोबदला स्वरूपात एफ.एस.आय., टि.डी.आर. अथवा धनादेशाद्वारे देण्यात येईल व खुल्या जागेचा दर रक्कम रूपये 18,000/- चौ.मी. प्रमाणे देणे बद्दल आदेश होते.

नगर भूमापन क्रमांक 14193/पैकी क्षेत्र 62.25 चौ.मी. बाधीत होत असून दर रूपये 18000/- चौ.मी. प्रमाणे मा.स्थायी समितीच्या दिनांक 30.5.2009 च्या सभेमधील विषय क्रमांक 7 च्या अन्वये रक्कम रूपये 11,20,500/- ची मंजुरी प्राप्त आहे. परंतु सिध्द शिघ्र गणकाच्या नविन दर प्रमाणे रू.18900/- प्रति चौ.मी. प्रमाणे रक्कम रूपये 11,76,525/- होत आहे. यामुळे वाढीव रक्कम रूपये 56,025/- च्या अर्जदाराच्या मागणीनुसार मा.आयुक्त महोदयांची मंजुरी प्राप्त आहे. तरी वाढीव रक्कम रू.56025/- च्या मंजुरीसह प्रचलित पध्दती प्रमाणे खरेदी खतासाठी होणारा खर्च भूखंडधारक व महानगरपालिका हे 50 % - 50 % एवढा करतात. त्यासाठी जो खर्च येईल त्यासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 33,34,35 व 36 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट ते सिल्लेखाना 30.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत नगर भूमापन क्रमांक 14139/ पैकी सौ.शोभा भ्र.विजयसिंह राजपुत यांची 62.25 चौ.मी. क्षेत्रासाठी स्थायी समितीच्या दिनांक 30.5.2009 च्या सभेमधील ठराव क्रमांक 7 अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार सिध्द शिघ्र गणकाच्या नविन दरा प्रमाणे वाढीव रक्कम रूपये 56,025/- च्या मंजुरीसह प्रचलित पध्दती प्रमाणे खरेदी खतासाठी लागणाऱ्या खर्चासह संबंधीतास मोबदला अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 34 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, जकात विभागातील जकातीचे खाजगीकरण करण्यापूर्वीचे सर्व कालबाह्य अभिलेखें जसे वापरलेली जकात पावती, रहदारी, अनामत, करारपत्रक, जिन्सवार व इतर पावती पुस्तके व नोंदवह्या विक्रीसाठी दिनांक 20.7.2010 च्या वर्तमान पत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. दि.26.7.2010 पर्यंत एकूण 15 निविदांची विक्री झाली होती. दि.27.7.2010 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत एकूण 09 निविदा धारकांनी सदर अभिलेखे खरेदीसाठी लेखा विभागात निविदा सादर केल्या होत्या. सदर निविदा दि.27.7.2010 रोजी दुपारी 4.00 वाजता मुख्यलेखाधिकारी यांच्या दालनात उघडण्यात 4 आल्या. प्राप्त निविदापैकी 02 निविदा धारकांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार कागदपत्रांची पूर्तता न केल्याने त्यांचे लिफाफा क्रं.2 उघडण्यात आले नसून सदर दोन निविदा फेटाळण्यात आल्या आहेत. उर्वरित 7 निविदा उघडण्यात आल्या असून त्या निविदाधारकांची नावे व त्यांनी नमुद केलेले दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | पावती पुस्तकांचे दर | नोंदवहीचे दर |
|---|---|---|---|
| 1 | न्यु आर के ट्रेडींग कं., नांदेड | 6.11 | 10.11 |
| 2 | माधवराव विरभद्र पाटील, नांदेड | 7.51 | 9.00 |
| 3 | जे.एस.सपाटे, वेस्टेज स्क्रॅप सेंटर, औ.बाद | 6.05 | 9.25 |
| 4 | श्रृष्ठी पॅकेजींग, वाळूज, औरंगाबाद | 6.30 | 6.30 |
| 5 | आर के ट्रेडींग, औरंगाबाद | 5.30 | 8.55 |
| 6 | न्यु सहारा स्क्रॅप ट्रेडर्स, औरंगाबाद | 4.55 | 9.15 |
| 7 | मुनोन वेस्ट पेपर | 4.55 | 6.50 |

उपरोक्त दर तुलनात्मक तक्त्यानुसार रेखांकित केलेले माधवराव विरभद्र पाटील, नांदेड यांचे पावती पुस्तकाच्या विक्रीसाठी विक्रीचे दर इतरांच्या तुलनेत रू.7.51 प्रति किलो हे सर्वाधिक आहेत. तसेच न्यु आर के ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे नोंदवहीसाठीचे दर इतरांच्या तुलनेत रू.10.11 प्रति किलो हे सर्वाधिक आहेत. सदर अभिलेखे खरेदीदाराच्या पोत्यामध्ये भरून मा.स्थायी समितीच्या दोन सन्माननीय सदस्यांसमोर मध्यवर्ती जकात नाका येथील वजन काट्यावर त्याचे वजन केल्यानंतर बाहेरील खाजगी वजन काट्यावर सदर मालाचे पुन्हा वजन करण्यात येईल. पुरवठा धारकाने स्वत:चे पोते अभिलेखे भरण्यासाठी वापरल्यास झालेल्या वजनातून प्रती पोते 1 किलो वजनाची वजावट करण्यात येईल. तसेच जे अभिलेखे महानगरपालिकेच्या पोत्यामध्ये आहे ते अभिलेखे पोत्यासहित वजन करून अभिलेख्यांच्या दरात सदर पोते खरेदीदारास देण्यात येईल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम -1949 चे प्रकरण -8 मधील कलम-79 च्या तरतुदीनुसार उपरोक्त मालमत्तेचा विक्रीद्वारे विनियोग करण्याच्या मान्यतेस्तव व अभिलेखे पावती पुस्तके विक्रीसाठी प्राप्त उच्चतम दर श्री.माधवराव विरभद्र पाटील नांदेड यांचे प्रति किलो रू.7.51 व नोंदवह्या विक्रीसाठी न्यु आर के ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे दर रू.10.11 प्रति किलो मान्य करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जकात विभागातील जकातीचे खाजगीकरण करण्यापूर्वीचे सर्व कालबाह्य अभिलेखें पावती पुस्तकांसाठी प्राप्त झालेले उच्चतम दरानुसार, श्री.माधवराव विरभद्र पाटील नांदेड यांचे प्राप्त दर प्रति किलो रू.7.51 व नोंदवह्यासाठी न्यु आर के ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे प्राप्त दर रू.10.11 प्रति किलो या दराने विक्री करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 35 :**

मा.कार्यकारी अभियंता वार्ड ब व क, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगाव वार्ड क्र. 24 येथील विविध गल्ल्यांमधील ड्रेनेज लाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाची सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-09 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.11,60,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात देखभाल दुरूस्ती जलनिस:रण या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे व मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.11,60,000/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगाव वार्ड क्र. 24 येथील विविध गल्ल्यांमधील ड्रेनेज लाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,60,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 36 :**

कार्यकारी अभियंता (प्रभाग इ व फ) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्रं.81, जयभवानी नगर या प्रभागातून एक नाला जातो, सदर नाल्याच्या बाजुचा परिसर अनधिकृतपणे विकसीत झालेला असून सदर भाग गुंठेवारीत मोडतो व बऱ्याच ठिकाणी नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे. सदर ठिकाणी बऱ्याच ठिकाणी नाल्यावर अतिक्रमण झाल्याने पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास पावसाच्या पुराचे पाणी आजुबाजुच्या वसाहतीत शिरते व सदर पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी मार्ग नसल्याने सदर पुराचे पाणी रस्त्यावर व खुल्या भुखंडावर साचते. त्यामूळे सदर साचलेल्या दुषित पाण्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तुर्त फक्त पावसाचे पुराचे पाणी वाहुन जाण्यासाठी नाल्याची 1 ते 1.50 मी. खोली वाढविण्याचा अंदाज पत्रकात समावेश करण्यात आलेला आहे. दुसऱ्या टप्प्यात नाल्यावर असलेली अतिक्रमणे काढण्याचे नियोजन आहे.

सदर कामामुळे जय भवानी नगर मधून वाहणाऱ्या नाल्यातील पुराचे पाणी व्यवस्थीत वाहुन जाईल तरी कामाचे अंदाजपत्रक रू.10,20,700/- ला प्रशासकीय मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर. सदर कामाचा खर्च जलनिस:रण देखभाल दुरूस्ती (सन 2010-2011 चा अर्थसंकल्प) या मधुन करण्यात येईल. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रं. 81, जयभवानीनगर मधून वाहणाऱ्या नाल्यातील पुराचे पाणी व्यवस्थीत वाहुन जाण्यासाठी नाल्याची 1 ते 1.50 मीटर खोली वाढविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रू.10,20,700/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 37 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाकडुन राबविण्यात येत असलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यातील नागरी भागामध्ये होत असलेली लोकसंख्येची वाढ व नागरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता नागरी भागांच्या दिर्घकालीन गरजांचा विचार करून शहरी भागाचा नियोजनबध्द व सुनियोजीत विकास होण्याकरीता सर्वसमावेशक अभियान राबविणे साठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक -एनयुआर-2008/प्र.क्रं 203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत केलेली आहे.

औरंगाबाद शहर हे विभागीय मुख्यालयाचे ठिकाण असल्याकारणाने तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना या योजने अंतर्गत प्रथम प्राधान्य असल्याने औरंगाबाद शहराची निवड प्राधान्यक्रम देवुन केली गेलेली आहे.

सदरील महाअभियानात सहभागी होण्याचा व वरीलप्रमाणे 50% अनुदान व 50% कर्ज घेणे बाबत तसेच अभियाना अंतर्गत आवश्यक असलेले करारनामे (MOU) करणे व मान्यता घेणे, या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी जे जे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस व शासनाकडे पाठविणेस महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात आला असता मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20.2.2010 च्या ठराव

क्रं.1005 नुसार महाअभियान संदर्भाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे बाबत महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता दिलेली आहे.

मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेन्वये तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने औरंगाबाद शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणा करणेचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत नोंदणीकृत अशासकीय संस्थेकडुन, प्रायव्हेट कंन्सल्टंट कडुन या विभागाचे जा.क्रं./मनपा/शअ/111/2010 दिनांक 10.05.2010 नुसार रितसर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदरील निविदा विक्री दिनांक 12.5.2010 ते 20.5.2010 अखेरपर्यंत एकुण 05 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक 12.5.2010 ते 20.5.2010 अखेर पर्यंत एकुण 03 निविदा दर भरून लेखा विभागात खालील प्रमाणे प्राप्त झाल्या. सदरील प्राप्त निविदा Evatuation Committee च्या मंजुरीन्वये दिनांक 03.06.2010 रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात संबंधीत एजन्सीज यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर (एकुण प्रकल्प किमतीच्या) |
|---|---|---|
| 01 | मे.आर्क असोशिएटस, औरंगाबाद | 1.26 % + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त. |
| 02 | मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई | 3.31 % |
| 03 | मे.दि.निसर्ग कंन्सल्टंसी, नाशिक | 1.88 % |

परंतु Evatuation Committee ने निविदेतील अटी व शर्तीनुसार पाकीट क्रं.1 (Technical Envelope) व पाकीट क्रं.2 (Financial Bid) मधील प्राप्त निविदाधारकांची तांत्रिक माहिती व निविदाधारकंानी दाखल केलेले निविदा दर यांचे जे Final Evatuation केले त्यानुसार मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांनी 1 st Ranking Bider म्हणुन गुणानुक्रमे निवड झाल्यानुसार मा.आयुक्त महोदय यांनी मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांना त्यांनी दाखल केलेल्या एकुण प्रकल्प रक्कमेच्या 3.31 % निविदा दराबाबत वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांनी सदरील प्रकल्प अहवाल निविदेतील सर्व अटी व शर्तीनुसार एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.35 % + सर्व्हीस टॅक्स या दराने करण्यास तयारी दर्शविलेली असुन याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

करीता उपरोक्त नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणा करणेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व निविदेतील अटी व शर्तीनुसार सदरील प्रकल्प अहवालास (DPR) शासनाच्या संबंधीत प्राधिकरणा/ यंत्रणेकडुन मंजुरी प्राप्त करून आणणेसाठी मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांची निविदा त्यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेल्या एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.35% + सर्व्हीस टॅक्स सह निविदा दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 37 ते 40 हे पीएमसी नेमण्याचे आहेत. महानगरपालिकेला निधी मिळावा हि सर्वांचीच भुमिका आहे. सदरील विषयाचा विस्तारित खुलासा अपेक्षीत आहे. मे.आर्क असोशिएटस नावाची संस्था 1.26 टक्क्याने काम करण्यास तयार आहे परंतु प्रस्तावामध्ये मे.फोट्रिक्स इन्फ्रास्ट्रक्चर,मुंबई यांना काम देण्यात यावे असे आहे. विषय क्रमांक 40 मध्ये निवीदाच काढलेली नाही. कलम 67 (3)(क) मध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल मा.आयुक्तांच्या मान्यतेने पाठविलेले दिसते. मे.एस.बी.एस.असोशिएटस ला दोन टक्के कंन्सल्टंसी फिस देणार आहोत. मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर,मुंबई यांना 3.31 ने काम का देण्यात येत आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता :शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत निधी मिळणार आहे त्यानुषंगाने सविस्तर अहवाल शासनास पाठवायचा आहे. दिनांक 20 फेब्रुवारी 2010 रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला होता. त्यानुसार दिनांक 22 तारखेला 660 कोटीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविले होते. त्यापैकी शासनाने 339 कोटींचे प्रस्ताव एम.जे.पी. मार्फत सादर करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुषंगाने 339 कोटींचे प्रस्ताव सादर केलेले आहे त्यात शहरातील जलनिसा:रण सीवरेज ट्रीटमेंट प्लांट, मलनिःस्सारण प्रक्रीया प्रकल्प यांचा समावेश होता सक्षम प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी काही सूचना केलेल्या आहेत. अहवाल ढोबळ मानाने केले होते, त्रोटक माहीती होती. प्रपोजल त्यांच्या नार्मस् मध्ये बसत नव्हते. रद्द केले. ते सुधारित करून सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या होत्या. प्रस्ताव क्रमांक 40 मध्ये 660 कोटींचे प्रस्ताव मे.एस.बी.एस.असोसीएशन यांचेकडून एका रात्रीतुन तयार करण्यात आलेले होते ते ढोबळमानाने तयार करण्यात आलेले होते. साइडवर नोडल ऑफिस ठेवले. आता त्यांचेकडून आपल्या मागणी प्रमाणे सविस्तर अंदाजपत्रक तयार करून मागणी प्रमाणे 3 प्रस्तावासाठी निविदा काढण्यात आले. उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार हि जी निवीदा प्रक्रीया होती ती मार्कींग सिस्टीम ठेवण्यात आले होते. गुणवत्ता इत्यादीसाठी 20 मार्कस्, टेक्निकल, फायनॅनशिअल बिडरसाठी 80 मार्कस् फायनॅ्नशीअल स्ट्रक्चर आणि टेक्नीकल स्ट्रक्चर बेस होते. त्यानुसार 5 मेंबरची Evaluation Committee तयार केली त्यात मुख्य लेखापरिक्षक, लेखाधिकारी, शहर अभियंता,कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता या सर्वांची त्याची छाननी केली.मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर,मुंबई यांनी 700 कोटी रूपयांचे प्रस्ताव शासनाकडुन मंजूर करून घेतलेले आहे. त्यांचे रेट जास्त होते, रँकिंग करायचे होते. रँकिंग पध्दतीने Evaluation Committee ने निवड केलेली आहे. फस्ट रँकिंग बीडर यांना वाटाघाटीला बोलावण्यात आले. वाटाघाटीअंती दर निश्चित करण्यात आलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :एका प्रपोजलसाठी 8 कोटी त्यांना देणार आहे अशे चार प्रोजेक्टसाठी जवळपास 25 करोड रूपये पाण्यात घालणार आहे. संबधीत एजन्सीला पुन्हा एकदा बोलविण्यात यावे. ज्यापध्दतीने 2 टक्कयाने इतर एजन्सी काम करण्यास तयार आहे मे.एस.बी.एस.अशोशिएटस हिचा स्विकार केलेला आहे. तेही 2 टक्क्याने काम करण्यास तयार आहे.

उपअभियंता :शासनास प्रस्ताव सादर करून मान्यता घेणे व वेगवेगळया कमिटींची मान्यता घेणे व निधी मनपास प्राप्त करुन देणे.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक 37 ते 40 मध्ये ज्या एजन्सीला काम दिले आहे त्यांनाही सारखेच काम करायचे आहे ते 2 टक्क्यांमध्ये काम करण्यास तयार आहे. सर्वेक्षण करणे, प्रपोजल करणे, डिपीआर बनविणे शासनाकडे दाखल करणे, शासनाकडुन त्यास प्राप्ती करुन घेणे मग सदरची एजन्सी 2 टक्यामध्ये काम

करण्यास तयार असतांना मे.फोट्रीक्स यांना 1.31 टक्के वाढुन देण्याची काय गरज आहे खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता :कामाचे स्वरूप वेगवेगळे आहे. पुर्ण शहराचे मेन सीवर लाईन डिजाईन करायचे आहे. कामाच्या कार्यपध्दतीत बदल आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहराची प्राथमिक स्तरावरची माहिती मनपाकडे उपलब्ध आहे. त्यास फक्त Reconstruct करायचे आहे अशा हया कामाचे स्वरूप आहे. 1 टक्का म्हणजे प्रत्येक प्रपोजलमध्ये चार करोडपेक्षा जास्त निधी चालला आहे. तरी मा.आयुक्तांनी पुन्हा वाटाघाटीसाठी बोलवावे. पीएमसी नियुक्त करण्यास आमचा विरोध नाही. जे जास्तीचे पैसे जात आहे त्याकडे लक्ष घातले पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाकडे जो डिपीआर सादर केलेला आहे तो कुणी तयार केलेला आहे. डी.पी.आर वरिल फोटो कोण तयार केला. मंजूर करण्यास हरकत नाही परंतु मनपाची फसवणुक करीत असेल तर त्यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावा. जो डिपीआर तयार करण्यात आलेला आहे तो मनपा प्रशासनाने तयार केलेला आहे का? जे फोटो काढलेले आहे ते एस.बी.एस.यांनी की, कोणी दुसऱ्यांकडून काढण्यात आलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांचा खुलासा घेण्यात यावा त्यानंतर स.सदस्य श्री.साजेद यांचा विषय घेण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :एस.बी.एस.असोसिएटस् यांनी जो फोटो स्थायी समितीत मंजूरीसाठी सादर केलेला आहे. एस.बी.एस.चे कागदपत्र आहे ते चोरलेले असून त्याचा नकाशा मुंबई संस्थेने तयार केलेले आहे. बाहेर दहा रूपयांमध्ये संबधीत व्यक्तीकडुन मागविता येईल. एक सुलभ शौचालय 12.50 लाखात 99 वार्डात करणार आहे. औरंगपूरा येथील सुलभ सौचालयाचे बांधकाम केलेले आहे. हा नकाशा त्यांचा असेलतर खुलासा करण्यात यावा. कोटयावधी रूपयांची मा.आयुक्तांची फसवणुक केलेली आहे.

मा.सभापती :चोरले म्हणुन कसे सांगु शकता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :जसे उल्हासनगर 1 पेन 10 रूपये त्याची मुळ कंपणी वेगळी त्यांचे कार्यालयातून चोरून अधिकाऱ्यांशी संगणमत करून तयार केले. दोषीवर एफआयआर दाखल करावा. मा.आयुक्तांची दिशाभूल,मुंबईचे नकाशे चोरून फसवणूक केली ओरीजनल डी.पी.आर.ची कॉपी मागवावी.

मा.सभापती :स.सदस्य श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी सभागृहात जे पुस्तक दाखविलेले आहे. महानगरपालिकेची फसवणुक केली असे त्यांचे म्हणने आहे. संबधीत अधिकारी यांनी यासंबधी खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मुंबई लिहलेले आहे दिसते.

श्री.रेणुकादास वैद्य :Negotiation करण्यात यावे, अटी व शर्ती टाकण्यात यावे. शासनाकडे प्रस्ताव सादर केला आणि तो रिजेक्ट झाला असे न होता. जेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घ्यावे. जे पेमेंन्ट देण्यात येईल ते शासनाकडुन निधी आणल्यानंतर त्यातुन त्यांचे पेमेंन्ट करण्यात यावे.

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी संबधीत एजन्सीला बोलावुन त्यांचेशी वाटाघाटी करावी योग्य वाटल्यास पुन्हा चर्चा करून शक्य होईल तेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घ्यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अगोदर मा.आयुक्तांनी चर्चा करणेसाठी बोलविण्यात यावे मनपाच्या हिताचे आहे. डी.पी.आर मागवावे.

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी संबधीत एजन्सीला बोलावुन त्यांचेशी वाटाघाटी करावी योग्य वाटल्यास पुन्हा चर्चा करून शक्य होईल तेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घ्यावे. जे पेमेंन्ट देण्यात येईल ते शासनाकडुन निधी आणल्यानंतर त्यातुन त्यांचे पेमेंन्ट करण्यात यावे. ज्या एजन्सीने सभागृहाची, मा.महापौर, मा.आयुक्तांची दिशाभुल केली असेल तर संबधीतांना ब्लॅक लिस्ट करता येईल किंवा संबधीता विरूध्द गुन्हा दाखल करण्यात येईल किंवा योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सर्वप्रथम मा.आयुक्तांकडून खुलासा घेण्यात यावा. डीपीआर ची कॉपी दाखविण्यात यावी. मी तुम्हाला दाखवितो. विषय क्रमांक 37,38,39,40 मध्ये स.स.श्री.रेणुकादास वैद्य यांनी सांगीतल्याप्रमाणे तसेच मनपाचे हित सर्वप्रथम आहे. सर्वांचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :विषय क्रमांक 37,38,39 मंजूर करू, सर्वाचा खुलासा घेण्यात येइल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सर्वांचा खुलासा करण्यात यावा. मंजूर करण्यास हरकत नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी स.सदस्यांचा खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता :स.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो बरोबर आहे. हे एक सॅम्पल डीपीआर पाठविलेले आहे. विषय क्रमांक 40 ठेवलेला आहे. परिस्थितीनुसार सविस्तर अहवाल तयार करायचा आहे.22 तारखेला रात्री संबधीत विभागाने त्यांची मदत घेऊन सॅम्पल डीपीआर पाठविलेले होते शासनाने त्यास मान्यता दिलेली नाही. हे सॅम्पल आहे आपल्याला नव्याने तयार करायचे आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:एका युनिटची किंमत 12.50 लाख रूपये आहे. एक युनीटला पैसे देण्यास हरकत नाही. 12 लाख 50 हजार X 99 वार्ड =24 कोटी 75 लाख देण्यास माझा विरोध आहे.आपणांस मंजूर करायचे करु शकता मा.उच्च न्यायालयात भेटू. शासनाकडे चुकीचा प्रस्ताव गेला खालच्या अधिकाऱ्यांकडून मा.आयुक्तांची दिशाभुल करण्यात आली. मा.आयुक्तांकडुन खुलासा घेण्यात यावा कि सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे किंवा नाही. मनपाचे कोटयावधी रूपये पाण्यात चालले आहे. एस.बी.एस.वर गुन्हा दाखल करावा. एका युनिटसाठी 12 लाख 50 हजार रूपये देत आहे.

उपअभियंता :स.सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे बरोबर आहे. सर्व प्रस्ताव शासनाकडे गेले आहे. शासनाने त्यात त्रुटी आपल्यासमोर आणलेल्या आहे. सविस्तर प्रकल्प शासनाकडे सादर करायचा आहे. म्हणुन प्रस्ताव विचारार्थ ठेवलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :इस्टीमेटमध्ये 9 नंतर 12 आलेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :अंदाजपत्रक तयार करतांना Item code D.S.R specification नंबर 1 ते 9 नंतर लगेच 12 आले आहे. Item चा त्यात समावेश केलेला आहे.

डीएसआरमध्ये स्पेसीफिक नंबर आणि तो Item नंबर टाकण्यात आलेला आहे. 9 नंतर लगेच 12 दिसत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शहर अभियंता यांनी सांगावे की, त्यांच्या स्वाक्षरीनिशी प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे.

मा.सभापती :ज्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनिशी पाठविण्यात आलेले आहे त्यांनी खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अधिकाऱ्यांची प्रॅक्टीस आहे. मुंबईला जायचे. 16 स्थायी समिती सदस्यांवर गुन्हा दाखल झाले तर मुंबईला कोणाच्या सहीने कोणी चर्चा करुन पाठविले, स्वाक्षरी करणारे वेगळे तसेच खुलासा करणारे वेगळे. शासनाचे आदेश आल्यानंतर मा.आयुक्तांनी प्रस्ताव पाठविला. मा.आयुक्त प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देऊ शकत नाही. खालच्या अधिकाऱ्यांचे काम आहे की, प्रस्ताव योग्यरितीने तयार करून तो मा.आयुक्तांकडे व शासनाकडे पाठवावा. माझा ठराव मंजूर करण्याला विरोध नाही.

मा.सभापती :दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते. पेमेंट महानगरपालिकेने करू नये. जे पेमेंन्ट देण्यात येईल ते शासनाकडुन निधी आणल्यानंतर त्यातुन त्यांचे पेमेंन्ट करण्यात यावे.

उपअभियंता :इस्टीमेट तयार होणार आहे डीपीआर तयार झाल्याच्या नंतर करायचे आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :339 कोटी रूपये एमजीपी करणार आहे.

उपअभियंता :प्राथमिक प्रकल्प अहवाल दाखविल्यानंतर शासनाने ते स्विकारले नाही. सविस्तर डिपीआर तयार करण्यात येत आहे.

श्री.जगदिश सिध्द :सदरील काम मनपाच्या माध्यमातुन करणार आहे का की, शासनाच्या.

उपअभियंता :जी.आर नुसार काम होणार आहे.

श्री.अ.सत्तार अ.साजेद :सभागृहाची दिशाभुल करीत आहे. पुर्ण शासनाच्या निधीतुन काम होणार आहे काय? मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रस्ताव आलेला आहे. महाराष्ट्र शासनाची योजना आहे. पायाभुत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकांना दिले जाणारे अनुदान जे 50 टक्के अनुदान असणार आहे. 50 टक्के लोन असणार आहे. लोन हे कमी व्याज दराने साधारण 4 टक्के व्याज दराने अपेक्षीत आहे. क्रिस्टल कंन्सल्टंट किंवा मनपा आपला निधी उभा करू शकते. नविनच योजना सुरू झालेली आहे त्याचे स्पेसिफिकेशन आलेले आहे. शासनाच्या सूचना आल्या होत्या की, ज्या महानगरपालिकेचा प्लॅन लवकर होऊ शकेल त्यांना निधी देण्याची शासनाची कार्यवाही सुरू केली जाईल. जाहिर होण्याच्या अगोदर अधिकाऱ्यांना रात्रंदिवस बसुन/सांगून Tentative आराखडा तयार करण्यात आला. 661 कोटींचा आराखडा शासनास पाठविला होता. मनपा निवडणूकीनंतर शासनाने कळविण्यांत आले की नऊ पैकी सहा बाबी तत्वतः मान्य करण्यात आलेल्या आहेत. 450 कोटींच्या प्लॅनला तत्वतः मान्यता दिलेली आहे. शासनाने सूचना दिल्यात कि, याचा तपशिलवार डिपीआर तयार करा. तत्वतःमान्य करण्यासाठी काही माहिती पाठविण्यात आली होती. याच्यावर तपशिलवार काम करित आहोत.

वेगवेगळया पिएमसी नेमण्यासंदर्भांत प्रस्ताव मांडलेला आहे. काही ठिकाणी रेट जास्त आहे. सभागृहात सांगीतल्याप्रमाणे आदेशीत केल्याप्रमाणे पुन्हा वाटाघाटीसाठी आमंत्रित करू. पुर्वी पाठविलेला प्लॅन मोघम स्वरूपाचा होता आता तपशिलवार प्लॅन पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी पीएमसी नेमणुक करायची आहे. मंजूरी दिल्यानंतरच आराखडा तयार करता येईल, शासनाकडे पाठविता येईल. माझी सभागृहास विनंती आहे की, ज्या सूचना केल्यात त्या सूचना लक्षात घेऊन पुढील योग्य कार्यवाही केली जाईल तरी योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती :विषय 40 पर्यंत दुरूस्तीसह मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-2008/प्र.क्रं. 203/नवि-33, दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत औरंगाबाद शहरातील मलनिःसारण व्यवस्था सुधारणा करणेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी संबधीत एजन्सीला बोलावून त्यांचेशी वाटाघाटी करून योग्य वाटल्यास पुन्हः चर्चा करून शक्य होईल तेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घेण्यास आणि शासनाकडून निधी आल्यानंतर त्यातून त्यांचे देयक अदा करण्यास व सभागृहास दिलेल्या सूचना प्रमाणे कार्यवाही करणे इत्यादी दुरूस्तीसह सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 38 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाकडुन राबविण्यात येत असलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यातील नागरी भागामध्ये होत असलेली लोकसंख्येची वाढ व नागरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता नागरी भागांच्या दिर्घकालीन गरजांचा विचार करून शहरी भागाचा नियोजनबध्द व सुनियोजीत विकास होण्याकरीता सर्वसमावेशक अभियान राबविणे साठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक -एनयुआर-2008/प्र.क्रं 203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत केलेली आहे.

औरंगाबाद शहर हे विभागीय मुख्यालयाचे ठिकाण असल्याकारणाने तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना या योजने अंतर्गत प्रथम प्राधान्य असल्याने औरंगाबाद शहराची निवड प्राधान्यक्रम देवुन केली गेलेली आहे.

सदरील महाअभियानात सहभागी होण्याचा व वरीलप्रमाणे 50% अनुदान व 50% कर्ज घेणे बाबत तसेच अभियाना अंतर्गत आवश्यक असलेले करारनामे (MOU) करणे व मान्यता घेणे, या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी जे जे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस व शासनाकडे पाठविणेस महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात आला असता मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20.2.2010 च्या ठराव क्रं.1005 नुसार महाअभियान संदर्भाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे बाबत महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता दिलेली आहे.

मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेन्वये तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने औरंगाबाद शहरातील गुंठेवारी अंतर्गत येणाऱ्या वसाहतीमध्ये नागरी सुविधा पुरविणे बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत नोंदणीकृत अशासकीय संस्थेकडुन, प्रायव्हेट कंन्सल्टंट कडुन या

विभागाचे जा.क्रं./मनपा/शअ/111/2010 दिनांक 10.05.2010 नुसार रितसर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदरील निविदा विक्री दिनांक 12.5.2010 ते 20.5.2010 अखेरपर्यंत एकुण 04 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक 12.5.2010 ते 20.5.2010 अखेर पर्यंत एकुण 04 निविदा दर भरून लेखा विभागात खालील प्रमाणे प्राप्त झाल्या. सदरील प्राप्त निविदा Evatuation Committee च्या मंजुरीन्वये दिनांक 03.06.2010 रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात संबंधीत एजन्सीज यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर (एकुण प्रकल्प किमतीच्या) |
|---|---|---|
| 01 | मे.आर्क असोशिएटस, औरंगाबाद | 0.88 % + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त. |
| 02 | मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई | 3.31 % |
| 03 | मे.दि.निसर्ग कंन्सल्टंसी, नाशिक | 2.18 % |
| 04 | मे.एस.बी.एस.असोशिएटस, औरंगाबाद | 2.40 % |

परंतु Evatuation Committee ने निविदेतील अटी व शर्तीनुसार पाकीट क्रं.1 (Technical Envelope) व पाकीट क्रं. 2 (Financial Bid) मधील प्राप्त निविदाधारकांची तांत्रिक माहिती व निविदाधारकंनी दाखल केलेले निविदा दर यांचे जे Final Evatuation केले त्यानुसार मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांनी 1 st Ranking Bider म्हणुन गुणानुक्रमे निवड झाल्यानुसार मा.आयुक्त महोदय यांनी मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांना त्यांनी दाखल केलेल्या एकुण प्रकल्प रक्कमेच्या 3.31 % निविदा दराबाबत वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांनी सदरील प्रकल्प अहवाल निविदेतील सर्व अटी व शर्तीनुसार एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.35 % + सर्व्हीस टॅक्स या दराने करण्यास तयारी दर्शविलेली असुन याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

करीता उपरोक्त नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद शहरातील गुंठेवारी अंतर्गत येणाऱ्या वसाहतीमध्ये नागरी सुविधा पुरविणे बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व निविदेतील अटी व शर्तीनुसार सदरील प्रकल्प अहवालास (DPR) शासनाच्या संबंधीत प्राधिकरणा/ यंत्रणेकडुन मंजुरी प्राप्त करून आणणेसाठी मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांची निविदा त्यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेल्या एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.35 % + सर्व्हीस टॅक्स सह निविदा दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-2008/प्र.क्रं. 203/नवि-33, दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत औरंगाबाद शहरातील गुंठेवारी अंतर्गत येणाऱ्या वसाहतीमध्ये नागरी सुविधा पुरविणे बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी संबधीत एजन्सीला बोलावून त्यांचेशी वाटाघाटी करून योग्य वाटल्यास पुन्हः चर्चा करून शक्य होईल तेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घेण्यास आणि शासनाकडून निधी आल्यानंतर त्यातून त्यांचे देयक अदा करण्यास व सभागृहास दिलेल्या सूचना प्रमाणे कार्यवाही करणे इत्यादी दुरूस्तीसह सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 39 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाकडुन राबविण्यात येत असलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यातील नागरी भागामध्ये होत असलेली लोकसंख्येची वाढ व नागरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता नागरी भागांच्या दिर्घकालीन गरजांचा विचार करून शहरी भागाचा नियोजनबध्द व सुनियोजीत विकास होण्याकरीता सर्वसमावेशक अभियान राबविणे साठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक -एनयुआर-2008/प्र.क्रं 203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत केलेली आहे.

औरंगाबाद शहर हे विभागीय मुख्यालयाचे ठिकाण असल्याकारणाने तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना या योजने अंतर्गत प्रथम प्राधान्य असल्याने औरंगाबाद शहराची निवड प्राधान्यक्रम देवुन केली गेलेली आहे.

सदरील महाअभियानात सहभागी होण्याचा व वरीलप्रमाणे 50% अनुदान व 50% कर्ज घेणे बाबत तसेच अभियाना अंतर्गत आवश्यक असलेले करारनामे (MOU) करणे व मान्यता घेणे, या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी जे जे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस व शासनाकडे पाठविणेस महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात आला असता मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20.2.2010 च्या ठराव क्रं.1005 नुसार महाअभियान संदर्भाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे बाबत महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता दिलेली आहे.

मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेन्वये तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने औरंगाबाद शहरातील नैसर्गिक नाला प्रवाहाच्या दोन्ही बाजुने भिंत बांधुन नाला ट्रेनिंग करणेच्या कामाबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत नोंदणीकृत अशासकीय संस्थेकडुन, प्रायव्हेट कंन्सल्टंट कडुन या विभागाचे जा.क्रं./मनपा/शअ/111/2010 दिनांक 10.05.2010 नुसार रितसर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदरील निविदा विक्री दिनांक 12.5.2010 ते 20.5.2010 अखेरपर्यंत एकुण 05 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक 12.5.2010 ते 20.5.2010 अखेर पर्यंत एकुण 03 निविदा दर भरून लेखा विभागात खालील प्रमाणे प्राप्त झाल्या. सदरील प्राप्त निविदा Evatuation Committee च्या मंजुरीन्वये दिनांक 03.06.2010 रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात संबंधीत एजन्सीज यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर (एकुण प्रकल्प किमतीच्या) |
|---|---|---|
| 01 | मे.आर्क असोशिएटस, औरंगाबाद | 1.08 % + सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त. |
| 02 | मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई | 3.31 % |
| 03 | मे.दि.निसर्ग कंन्सल्टंसी, नाशिक | 1.98 % |

परंतु Evatuation Committee ने निविदेतील अटी व शर्तीनुसार पाकीट क्रं.1 (Technical Envelope) व पाकीट क्रं. 2 (Financial Bid) मधील प्राप्त निविदाधारकांची तांत्रिक माहिती व निविदाधारकांनी दाखल केलेले निविदा दर यांचे जे Final Evatuation केले त्यानुसार मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांनी 1 st Ranking Bider म्हणुन गुणानुक्रमे निवड झाल्यानुसार मा.आयुक्त महोदय यांनी मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांना त्यांनी दाखल केलेल्या एकुण प्रकल्प रक्कमेच्या 3.31 % निविदा दराबाबत वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांनी सदरील प्रकल्प अहवाल निविदेतील सर्व अटी व शर्तीनुसार एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.00 %

+ सर्व्हीस टॅक्स या दराने करण्यास तयारी दर्शविलेली असुन याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

करीता उपरोक्त नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद शहरातील नैसर्गिक नाला प्रवाहाच्या दोन्ही बाजुने भिंत बांधुन नाला ट्रेनिंग करणेच्या कामाबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व निविदेतील अटी व शर्तीनुसार सदरील प्रकल्प अहवालास (DPR) शासनाच्या संबंधीत प्राधिकरणा/ यंत्रणेकडुन मंजुरी प्राप्त करून आणणेसाठी मे.फोट्रीक्स इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांची निविदा त्यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेल्या एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.00 % + सर्व्हीस टॅक्स सह निविदा दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-2008/प्र.क्रं. 203/नवि-33, दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत औरंगाबाद शहरातील नैसर्गिक नाला प्रवाहाच्या दोन्ही बाजुने भिंत बांधुन नाला ट्रेनिंग करणेच्या कामाबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी संबधीत एजन्सीला बोलावून त्यांचेशी वाटाघाटी करून योग्य वाटल्यास पुन्हः चर्चा करून शक्य होईल तेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घेण्यास आणि शासनाकडून निधी आल्यानंतर त्यातून त्यांचे देयक अदा करण्यास व सभागृहास दिलेल्या सूचना प्रमाणे कार्यवाही करणे इत्यादी दुरूस्तीसह सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 40 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाकडुन राबविण्यात येत असलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यातील नागरी भागामध्ये होत असलेली लोकसंख्येची वाढ व नागरीकरणाचा वाढता वेग लक्षात घेता नागरी भागांच्या दिर्घकालीन गरजांचा विचार करून शहरी भागाचा नियोजनबध्द व सुनियोजीत विकास होण्याकरीता सर्वसमावेशक अभियान राबविणे साठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक -एनयुआर-2008/प्र.क्रं 203/नवि-33 दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत केलेली आहे.

औरंगाबाद शहर हे विभागीय मुख्यालयाचे ठिकाण असल्या कारणाने तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना या योजने अंतर्गत प्रथम प्राधान्य असल्याने औरंगाबाद शहराची निवड प्राधान्यक्रम देवुन केली गेलेली आहे.

सदरील महाअभियानात सहभागी होण्याचा व वरीलप्रमाणे 50% अनुदान व 50% कर्ज घेणे बाबत तसेच अभियाना अंतर्गत आवश्यक असलेले करारनामे (MOU) करणे व मान्यता घेणे, या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी जे जे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस व शासनाकडे पाठविणेस महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात आला असता मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20.2.2010 च्या ठराव क्रं.1005 नुसार महाअभियान संदर्भाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे बाबत महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता दिलेली आहे.

मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेन्वये तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदरील महाअभियानात सहभागी होण्याच्या दृष्टीने औरंगाबाद शहरातील विविध विकास कामांचे प्रकल्प

अहवाल (DPR) शासनास सादर करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने कामाची निकड लक्षात घेता औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेच्या कामाबाबतचा रक्कम रूपये 24.75 कोटी रकमेचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) मे.एस.बी.एस.असोशिएटस, औरंगाबाद या स्थानिक कन्सल्टन्सी कडून तयार करून घेण्यात आलेला होता.

सदरील विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) मा.सचिव, नगर विकास विभाग, मुंबई यांचेकडे पत्र क्रं./मनपा/मआ/स्वीस/91 दिनांक 22.02.2010 नुसार पाठविण्यात आलेला असून या विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) बाबत शासनाने कोणतीही दुरूस्ती सुचविलेली नाही.

सदरील विस्तृत प्रकल्प अहवालास जा.क्रं./मनपा/शअ/111/2010 दिनांक 10.05.2010 नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सुचनेतील सर्व अटी व शर्तीसह तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीसह शासनाकडून मंजूरी आणणे आवश्यक असल्याने एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.00 % या दराने मे.एस.बी.एस. असोशिएटस यांच्याकडून शासन मंजुरी चे काम करून घेण्यास व याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

करीता उपरोक्त नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेच्या कामाबाबतचा शासनास वरील नुसार सादर करण्यात आलेला रक्कम रूपये 24.75 कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवालास (DPR) जा.क्र./मनपा/शअ/111/2010 दिनांक 10.5.2010 नुसारच्या निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीसह शासनाच्या संबंधीत प्राधिकरणा/यंत्रणेकडून मंजुरी प्राप्त करून आणणे साठी मे.एस.बी.एस.असोशिएटस यांना एकुण प्रकल्प रक्कमेच्या 2.00 % दराने कंन्सल्टंसी फी म्हणुन नियुक्त करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरूवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-2008/प्र.क्रं. 203/नवि-33, दिनांक 20 फेब्रुवारी 2010 अंतर्गत औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेच्या कामाबाबतचा शासनास वरील नुसार सादर करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवालास (DPR) तयार करणेसाठी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी संबधीत एजन्सीला बोलावून त्यांचेशी वाटाघाटी करून योग्य वाटल्यास पुन्हः चर्चा करून शक्य होईल तेवढया कमी दराने करता येईल तेवढे कमी करून घेण्यास आणि शासनाकडून निधी आल्यानंतर त्यातून त्यांचे देयक अदा करण्यास व सभागृहास दिलेल्या सूचना प्रमाणे कार्यवाही करणे इत्यादी दुरूस्तीसह सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 41 :</u>**

कार्यकारी अभियंता (इ व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मल्हार चौक ते विजयनगर पासून ते तिरूपती विहार पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.1999900/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.371 दिनांक 28.02.2008 अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी तिसऱ्या वेळेस फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

1. मे उदय इंजिनियरींग वर्क्स 36.99 % जास्त दर

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांचे निविदांचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 36.99% जास्त असे आहेत.

दिनांक 03.07.2010 रोजी मा.महापौर यांनी अतिवृष्टी झाल्याने शहरातील परिस्थिती बाबत आढावा बैठक आयोजीत केली असता त्या प्रभागातील सर्व नगरसेवकांनी अतिवृष्टीमूळे संपूर्ण परिसर जलमय झालेला होता व नागरीकांच्या घरात पाणी शिरल्याच्या तक्रारी केल्या व सदर स्ट्रॉम वॉटर डिस्पोजलचा प्रस्ताव त्वरीत मंजूर करावा अशी आग्रहाची मागणी केली आहे.

त्यामूळे प्राप्त निविदा ही सन 2006-2007 च्या दरसुचीनुसार 36.99 % जास्त दराची असून त्याची किमंत रू.27.40 लक्ष होईल. सध्या प्रचलित दरसुची सन 2008-2009 आहे. या दराची तुलना केली असता खर्चात 34.09 % एवढी वाढ झालेली आहे. सध्या पावसाळा सुरू असून हे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. फेरनिविदा काढण्यास आणखी 15 ते 20 दिवस लागतील.

करीता संचिकेतील टिप्पणी पृष्ठ क्र.29 व 30 वरील टिप्पणीच्या अनुषंगाने सदर प्राप्त निविदा ही सन 2006-2007 च्या दरसुचीनुसार 36.99 % जास्त दराची आहे. सध्या सन 2008-2009 प्रचलित आहे.करीता आजच्या सन 2008-2009 च्या दरसूचीपेक्षा 2.90% जास्त व मुळ अंदाजपत्रका पेक्षा 36.99 % जास्त दराचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मल्हार चौक ते विजयनगर पासून ते तिरूपती विहार पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे या कामाकरीता प्राप्त झालेली मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांची अं.प. दरापेक्षा 36.99% जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 42 :**

कार्यकारी अभियंता प्रभाग- ई व फ, यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्रमांक 78 अंतर्गत चिकलठाणा परिसरात 100,150,200,250 व 300 मी.मी. व्यासाची डी. आय. के.-7 जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2008-09 च्या दरसुची नुसार रक्कम रूपये 40,65,954/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान अंतर्गत मागासक्षेत्र अनुदान निधी (BRGF) या मधुन करण्यात येणार आहे. तसेच सन 2010-11 च्या स्पिलओव्हर कामात सदर कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर कामासाठी बी-1 निविदा ई-निविदा मार्फत मागविण्यात आल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारीख व निर्धारित वेळेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

1. मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25 % कमी.
2. श्री.एस.बी.साधवाणी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4 % कमी.
3. व्ही.एस.देशमुख - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.9 % कमी.

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या पाहता सर्वात कमी दर हा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचा असून त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25 % कमी असा दर दिलेला असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता दिनांक 12/08/2010 रोजी झालेली आहे.

करीता मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25 % कमी दराची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्डक्रमांक 78 अंतर्गत चिकलठाणा परिसरात 100,150,200, 250 व 300 मी.मी. व्यासाची डी. आय. के.-7 जलवाहीनी टाकावयाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या

निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.25% कमी दराची मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 43 :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद शहर व जिल्ह्यासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केल्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/ डी.एम-1 दि. 25/07/2006 नुसार सेवा पुरवावी लागणार आहे तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06/12/2008 नुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी एक मिनी फायर टेंडर खरेदी करावयाचे आहे.

औरंगाबाद शहर हे झपाट्याने वाढत असून शहरातील झोपडपट्टी व इतर छोट्या छोट्या गल्लीमध्ये लागलेली आग विझवण्यास अत्यंत अवघड जाते. तसेच व्ही.आय.पी. बंदोबस्ताच्या कन्व्हॉय मध्ये अग्निशमन विभागाचे वाहन इतर वाहनांच्या सोबत न जाता मागे पडतात व जास्त जोरात धावतांना तोल जाऊन अपघात होत आहेत. यासाठी वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर खरेदी करणे अत्यंत आवश्यकता आहे. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.780 दि.21/12/2009 नुसार वॉटर मीस्ट मिनी फायर टेंडर खरेदी रूपये 40,06,100/- मान्यता मिळालेली असून यासाठी प्रशासकीय मान्यता दिनांक 05/08/2010 रोजी देण्यात आलेली आहे.

जाहीर निविदा राज्यस्तरीय वर्तमान पत्र दैनिक सामना मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद, दैनिक पुण्यनगरी औरंगाबाद तसेच ई-टेंडर मार्फत दर मागविण्यात आलेले आहेत. याबाबत दोन निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे फेर जाहीर निविदा दि.07/07/2010 रोजी देण्यात आली. त्यानंतर दि.22/07/2010 रोजी निविदा उघडल्या असता तीन निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यापुढील प्रमाणे आहेत. 1) एमईएस इंजिनिअरींग 2) मुरली टेक्नो प्रा.लि. 3) अल्फा ॲटोबोडीज यांच्या निविदा आलेल्या आहेत. यामध्ये एमईएस इंजिनिअरींग, ठाणे यांचे सर्वात कमी दराची (रूपये 39,66,039/-) निविदा आहे.

मा.आयुक्त यांच्या दालनात बैठकीमधील चर्चेनुसार जाहीर निविदेतील आलेल्या दरास 1 टक्का दर कमी करून रूपये 39,26,378/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :मनपाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. मंजूर झालेली कामे दुर्देवाने रद्द करण्यात आलेली आहे. प्रशासनास वारंवार विनंती करण्यात येते की, ड्रेनेजची समस्या ही दररोज उत्पन्न होणारी समस्या आहे. या समस्येस दररोज समोरे जावे लागते त्यासाठी प्रभागासाठी एक जेटींग मशीन देण्यात यावी परंतु मशीन न देता अशा प्रकारचे प्रस्ताव सभागृहासमोर ठेवले जातात व विविध अपघात होतात अशी कारणे दाखविली जातात हे चुकीचे आहे. मनपाची आर्थिक परिस्थिती योग्य नाही. त्यामुळे कशासाठी दोन करोड रूपये सदर प्रस्तावामध्ये टाकणार आहोत. पंचविस हजारांचे महत्वाचे कामे नगरसेवकांच्या वार्डात होत नाही.

मा.सभापती :प्रस्ताव वाचुन दाखविण्यात यावा.

अग्निशमन अधिकारी :अग्निशमन विभागासाठी मिनी फायर टेंडर खरेदी करावयाचे आहे. बराच वेळा पासून मोठे फायर टेंडर हे शहारातील लहान गल्ल्या, स्लम भागात जाता येत नाही. त्यासाठी अग्निशमन विभागास मिनी फायर टेंडरची अत्यंत आवश्यकता आहे. इतर महानगरपालिकेने मिनी फायर टेंडर घेतलेले आहेत म्हणुन हा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठेवुन आणि त्याचे चेसीस खरेदी करून आपल्यासमोर ठेवण्यात आलेले आहे. मान्यतेस्तव.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहून व कामाची आवश्यकता तपासुन पाहुन पुढील बैठकीत निर्णय घेऊ.

मा.सभापती :पुढील बैठकीपर्यंत विषय स्थगीत करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

सदरील प्रस्ताव पुढील बैठकीपर्यंत स्थगीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 44 :</u>**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद शहर व जिल्ह्यासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केल्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/ डी.एम-1 दि. 25/07/2006 नुसार सेवा पुरवावी लागणार आहे तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06/12/2008 नुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे पुरवठा करण्यात आलेल्या तीन टाटा 1613 एल.पी.टी. चेसीसवर फायर टेंडर फॅब्रीकेट करणे व त्याबरोबर लागणाऱ्या सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी करून देणेसाठी प्रस्तावित आहे.

अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबादसाठी फायर टेंडरचे चेसेस (चार नग) टाटा एल.पी.टी.1613/42 सी.एम.व्ही.आर. कॉन-ईरो-2 चेसेस खरेदी केलेले आहेत. सदरील खरेदी ही 12 वा वित्त आयोगाच्या अनुदानातून खरेदी केलेली आहे. यासाठी सर्वसाधारण सभेने ठराव क्र. 418 दिनांक 12/02/2009 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. विभागाने चार चेसेस खरेदी केलेले असून त्यापैकी तीन चेसेसवर फायर टेंडर फॅब्रिकेशन करावयाचे आहेत.

जाहीर निविदा सूचना राज्य / राष्ट्रीय स्तरावरील वर्तमान पत्र दैनिक टाईम्स ऑफ इंडिया, नवी दिल्ली, दैनिक लोकसत्ता, मुंबई, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दैनिक सामना, मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद तसेच ई-टेंडर मार्फत दर मागविण्यात आलेले आहेत. याबाबत तीन निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यापुढील प्रमाणे आहेत. 1) ब्रिजवासी हायटेक उद्योग 2) श्रीटेकॉन, हैद्राबाद 3) देवीफायर सर्व्हीसेस यांच्या निविदा आलेले आहेत. यामध्ये श्रीटेकॉन, हैद्राबाद यांचे दर सर्वात कमी आहेत. त्यांचे दर रूपये (99,97,325.00 + 2,49,665 Vat) = 1,12,46,990/- हे आहेत.

मा.आयुक्त यांच्या दालनातील बैठकीमधील चर्चेनुसार जाहीर निविदेतील आलेल्या दरास 1 टक्के दर कमी करून रूपये 1,11,34,520/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव पुढील बैठकीपर्यंत स्थगीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 45 :**

कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-2/2007/846 दिनांक 9/7/2007 आणि जा.क्र.मनपा/आस्था-2/2007/945 दिनांक 26/7/2007 नुसार नियुक्ती आदेश रद्द करून मनपा सेवेतून बडतर्फ केलेले सर्वश्री दशरथ साहेबराव भातपुडे, रविंद्र मोहन लोखंडे, देवराज नाथाजी वीर, सुरेश विष्णू गरूड, उत्तम परसराम सोनवणे, सुरेश भाऊसाहेब औताडे, अन्वरोद्दीन कमरोद्दीन, प्रताप रामचंद्र जाधव, विजय बंडूजी शेजवळ, राहुल देवराव वाकेकर, राजू रामदास रिडलॉन, आसिफखान ईब्राहीमखान, सांडू मोहन खरात व संतोष दादाराव तांबे असे एकूण 14 चतुर्थश्रेणी कर्मचारी/सफाई मजूर यांनी वर नमुद केलेले दि.9.7.2007 व 26.7.2007 चे आदेश रद्द करून त्यांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

श्री.अमित भुईगळ :मनपा सेवेतील कोणत्याही कर्मचाऱ्यास कायमस्वरूपी कामावरून काढुन टाकण्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यकता आहे. ज्या 15 कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले त्यांची स्थायी समितीत मंजूरी घेतलेली नाही. सेवेतुन कमी करतांना खाते चौकशी केलेली नाही. बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्यास कशाच्या आधारे कामावर घेण्यात आलेले आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे काय? तसेच सदरील कर्मचाऱ्यांना कामावरून का काढण्यात आले.

मा.सभापती :बडतर्फ 15 कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्यास कामावर कशाच्या आधारे घेण्यात आले.

अस्थापना अधिकारी-2 :15 कर्मचाऱ्यांना सेवेमध्ये नियुक्त्या देण्यात आलेल्या होत्या त्या काल्पनिक तारीख चुकीच्या आढळुन आल्या. लेखा विभागाने सांगितले की, त्यांचे 91 ला 93-94 ला.

श्री.अमित भुईगळ :काल्पनिक तारीख म्हणजे काय?

अस्थापना अधिकारी-2 :मा.उच्च न्यायालयात जी जेष्ठता यादी जोडण्यात आली होती त्याच्यामध्ये काल्पनिक तारीख देवुन त्या तारीख देण्यात आल्या होत्या.

मा.सभापती :काल्पनिक तारीख असलेले किती कर्मचारी आहेत.

अस्थापना अधिकारी-2 :प्राथमिक चौकशीमध्ये 15 कर्मचारी दोषी आढळुन आले होते. 15 कर्मचाऱ्यांना सेवेतुन कमी करण्याची कार्यवाही करण्यात आली. दोन चौकशी अधिकाऱ्यांची नेमणुक करून सविस्तर कागदपत्रांची चौकशी केली असता एकुण पात्र नियुक्तीच्या तारखेस वेतन न घेतलेले 102 कर्मचारी आढळुन आलेले आहे.

श्री.अमित भुईगळ :त्यांना काढण्यात आलेले नाही काय?

अस्थापना अधिकारी-2 :अजुन त्यांना काढलेले नाही .

श्री.अमित भुईगळ :LAQ झालेला आहे काय?

अस्थापना अधिकारी-2 :झालेला आहे.

श्री.अमित भुईगळ :उत्तर काय देण्यात आले खुलासा करण्यात यावा.

अस्थापना अधिकारी-2 :प्रकरणामध्ये 7 LAQ झालेले आहेत. मा.आमदार आण्णासाहेब माने पाटील,गंगापूर, मा.नामदेवराव पवार, कन्नड, श्री.सुभाष वानखेडे,हदगांव यांनी विधानसभा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. औरंगाबाद महानगरपालिकेतील 1124 भरती प्रकरणात मोठया प्रमाणात घोटाळा झाल्याचे माहे डिसेंबर 2006च्या सुरवातीस उघड झाले आहे हे खरे आहे काय? यासंदर्भात उत्तर देण्यात आले की, सन 2004 मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले 1124 रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ठ करण्याप्रकरणी कर निर्धारक व संकलक यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असुन 03.03.2007 रोजी अंतीम अहवाल प्राप्त झालेला आहे. प्रश्न 3. असल्यास या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय? त्यास काय आढळुन आलेले आहे. उत्तरः 1124 भरतीची संपुर्ण चौकशी कर निर्धारक व संकलक यांचेमार्फत करण्यात आली असुन दिनांक 03.03.2007 रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे. या अहवालाप्रमाणे श्री.संतोष दादाराव तांबे सन 1991 मध्ये 12 वर्ष वयाचा असतांना दैनिक वेतनावर लागला असे दिसुन येते. त्याच प्रकरणाचे एकुण 63 प्रकरण या अहवालात नमुद आहे.

श्री.अमित भुईगळ :गाजरगवत काढण्याकरीता त्यावेळेस रोजंदारीवर घेत होतो. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे 1124 कर्मचाऱ्यांना यादीत घेतले. चार वर्ष सेवा झाल्यानंतर टि.सी. व सेवापुस्तकासाठी आवश्यक कागदपत्र मागविण्यात आले होते त्यावेळेस त्यांचे वय 24 ते 25 वर्ष होते. मनपामध्ये चार ते पाच वर्ष सेवा केलेली आहे. मा.नगर विकास मंत्रालय यांनी मा.आयुक्तांना एक पत्र पाठविलेले आहे. की सदरील कर्मचाऱ्यांचा आपल्या स्तरावर निर्णय घेऊन कामावर घेण्यात यावे.

अस्थापना अधिकारी-2 :या प्रकरणामध्ये कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेणेबाबत दिनांक 26.10.2007 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्रमांक 1222 अन्वये अशासकीय ठराव मंजूर केला होता व त्यान्वये महानगरपालिकेस शासनास दिनांक 18.12.2007 रोजी पत्रान्वये कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यांत आलेला होता. शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. उक्त कर्मचाऱ्यांपैकी श्री.शेख असर शेख उस्मान यांनी सन 1991 पासुन काम केल्याचा पुरावा तसेच हजेरी पत्रके सादर केलीत त्याबाबत संबधीताने माहे जानेवारी 2001 ते डिसेंबर 2001 चा पगार अदा करण्याचा अहवाल मा.मुख्यलेखाधिकारी यांनी संबधीताला दिनांक 21.07.2008 रोजी आदेशान्वये सेवेत पुर्नस्थापीत करण्यात आलेले आहे. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र क्र.2008/919/प्रक्र12/नवि-24, दिनांक 06.01.2010च्या अन्वये महानगरपालिका सेवेतुन कमी करण्यात आलेले 15 सफाई कामगारांची पुन्हा नियमित सेवा सामावुन घेण्याची विनंती कायदेशिर तपासली असता ती मान्य करता येणार नाही असे पत्राने कळविण्यांत आलेले आहे. शासनाने.

मा.सभापती :कोणत्या नियमान्वये एका कर्मचाऱ्यांस कामावर घेण्यात आले.

अस्थापना अधिकारी-2 :सन 2001 पासुन काम केल्याचा पुरावा तसेच हजेरी पत्रके सादर केली. त्याबाबत संबधीताने माहे जानेवारी 2001 ते डिसेंबर 2001 चा पगार अदा करण्याचा अहवाल सादर करण्यात आला.उच्च न्यायालयाच्या यादीत संबधीताची जी तारीख होती त्याच तारखेमध्ये महानगरपालिकेने पगार अदा केला होता. ते सिध्द झालेले आहे. त्यामुळे सदरील कर्मचाऱ्यास कामावर घेण्यात आले.

मा.सभापती :कामावर घेऊ नये म्हणुन आदेशित होते मग कामावर का घेण्यात आले.

अस्थापना अधिकारी-2 :2010 मध्ये कामावर घेऊ नये म्हणुन आदेशित केले.

मा.सभापती :सन 2008 मध्ये घेण्यात आले. त्यांचे कसे.

अस्थापना अधिकारी-2 :लेखा विभागाने माहे जानेवारी 2001 ते डिसेंबर 2001 चा पगार अदा करण्याचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

श्री.अमित भुईगळ :बडतर्फीची स्थायी समितीत मंजूरी घेण्यात आली होती का? मंजूरी नसेल तर तात्काळ कर्मचाऱ्यांना कामावर घ्यावे लागेल.

अस्थापना अधिकारी-2 :सदर प्रकरणात स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही.

श्री.अमित भुईगळ :स्थायी समितीची मान्यता घेतलेली नसल्यामुळे व ते कायम नौकरीत असल्याने कर्मचारी हे चार ते पाच वर्ष काम करत असतांना स्थायी समितीची मंजूरी घेतलेली नसतांना सदरील 14 कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावर रूजु करून घेण्याचे आदेश देण्यात यावेत. सदरील कर्मचाऱ्यांची उपासमार होत आहे. दोन लोकांची पत्नी देखिल मृत्यु झाला आहे. दयनीय अवस्था झालेली आहे.त्यामुळे तात्काळ प्रशासनाने सदरील 14 कर्मचाऱ्यांना कामावर रूजू करून घेण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ :तात्पुरत्या स्वरूपात गाजर गवत काढण्यासाठी घेण्यात आले परंतु ज्यावेळेस उच्च न्यायालयाच्या यादीप्रमाणे कायम केले त्यावेळेस कर्मचाऱ्यांचे वय 18 वर्षाच्या वर होते. या प्रकरणांत LAQ झालेले आहे. सदर प्रकरणात तातडीने निर्णय घ्यावा.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी विषय क्रमांक 45 मध्ये सहानुभूतिने विचार करून 15 कर्मचाऱ्यांपैकी 01 कर्मचारी यांना कामावर घेतले आहे. तसेच उर्वरित 14 कर्मचारी यांना रूजू करून घ्यावे. जे नियमात बसेल त्या पध्दतीने कार्यवाही करून सकारात्मकरित्या त्यांच्या भविष्याबाबत व येणाऱ्या काळात उपासमारीची वेळ येवु नये याचा विचार करून योग्य निर्णय घेण्यात यावा. पुढील बैठकीत याबाबतीत सविस्तर अहवाल सादर करावा आणि प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मनपा सेवेतून बडतर्फ केलेले सर्वश्री दशरथ साहेबराव भातपुडे, रविंद्र मोहन लोखंडे, देवराज नाथाजी वीर, सुरेश विष्णु गरूड, उत्तम परसराम सोनवणे, सुरेश भाऊसाहेब औताडे, अन्वरोद्दीन कमरोद्दीन, प्रताप रामचंद्र जाधव, विजय बंडुजी शेजवळ, राहुल देवराव वाकेकर, राजु रामदास रिडलॉन, आसिफखान ईब्राहीमखान, सांडु मोहन खरात व संतोष दादाराव तांबे असे एकुण 14 चतुर्थश्रेणी कर्मचारी/सफाई मजूर यांनी वर

नमुद केलेले दिनांक 09.07.2007 व 26.07.2007 चे आदेश रद्द करून त्यांना पुर्ववत कामावर नियमानुसार रूजू करून तसेच त्यांच्या सेवा बाबतीतचा प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेण्यास व याबाबतचा अहवाल स्थायी समिती सभेपूढे सादर करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीनंतर सभा संपल्याचे मा.सभापती, स्थायी समिती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद